# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

■ शके १९४८ ■ वर्ष २६ ■ अंक ०१ ■ एप्रिल २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/– ■ पृष्ठ संख्या ३६
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 26 ■ ISSUE NO 01 ■ April 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 36









E-mail : hindubodh.pmp@gmail.com


तुमच्या वेगवान स्वप्नाला आमचं पाठबळ !
जनता
वाहनकर्ज
योजना
कमर्शियल वापराचे चारचाकी तसेच वैयक्तिक वापराचे चारचाकी / दुचाकी वाहन (इलेक्ट्रिक सह) इत्यादीसाठी कर्ज
*अटी व नियम लागू
आकर्षक व्याजदर । सुलभ प्रक्रिया । त्वरित कर्जवितरण
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.jsblpune.bank.in

मासिक

**हिंदुबोध**

**वर्ष - सव्वीसावे : अंक १ ला**

शके १९४८

**एप्रिल २०२६**



**संपादक**

**श्री. रविकांत कळंबकर**

ravi.kalambkar@gmail.com

**निवास**

**एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६, आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ, निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४**


अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध


**संपादक मंडळ**

श्री. किशोर चव्हाण - प्रांत मंत्री

श्री. ॲड. सतिश गोरडे - प्रांत सहमंत्री

श्री. कृष्णकांत चांडक - प्रांत कोषाध्यक्ष

श्री. श्रीपाद रामदासी - प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख

श्री. संजय गोडबोले - प्रांत प्रचार-प्रसार सहप्रमुख

श्री. अनिल सांबरे - नागपूर

श्री. विजयकुमार पिसे - सोलापूर

**संपादक मंडळ सदस्य**

श्री. नितीन वाटकर

प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी



**पत्र व्यवहार**

व्यवस्थापक

मनोज शेलार

मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/-, वार्षिक वर्गणी रु. २००/-

**मुद्रण स्थळ**

संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे - ३०.

दूरभाष : २४४८ ५६ ३२

sanwadpvt@gmail.com


## अनुक्रमणिका


- संपादकीय.... विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
  श्री. श्रीपाद रामदासी ............ ०५
- वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ............ ०७
- जानकी
  सौ. अरुंधती पंडीत ............ ११
- आद्य राष्ट्रसंत समर्थ श्री रामदासस्वामी
  अविनाश हळबे ............ १५
- बाबासाहेब आंबेडकर आणि दत्तोपंत ठेंगडीजी
  प्रमोद कुमार ............ १८
- राष्ट्रीय म्हणजे काय?
  डॉ. सचिन लादे ............ २२
- अक्षय्य तृतीया - सण अक्षय समृद्धीचा
  ॲड. स्वाती जेरे ............ २४
- प्रसंगावधान - एक स्वामुभव
  डॉ. संजीव दाते ............ २६
- डॉ. आंबेडकर - स्वा. सावरकर आणि चवदार तळे खटला
  डॉ. अभिराम दीक्षित ............ २८
- मंदिर और मेरी जिम्मेदारी
  माधवी सौंशी ............ ३१
- हनुमान चालीसा (मराठी अर्थासह) ओळख स्तोत्रांची भाग १
  संकलन : श्रीपाद रामदासी ............ ३२



प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी - ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## ठन गई! मौत से ठन गई!

**रचनाकार : अटल बिहारी वाजपेयी**

जूझने का मेरा इरादा न था,
मोड़ पर मिलेंगे इसका वादा न था ।

रास्ता रोक कर वह खड़ी हो गई,
यों लगा ज़िंदगी से बड़ी हो गई ।।

मौत की उमर क्या है? दो पल भी नहीं,
ज़िंदगी-सिलसिला, आज-कल की नहीं ।

मैं जी भर जिया, मैं मन से मरूँ,
लौटकर आऊँगा, कूच से क्यों डरूँ? ।।

तू दबे पाँव, चोरी-छिपे से न आ,
सामने वार कर फिर मुझे आज़मा ।

मौत से बेख़बर, ज़िंदगी का सफ़र,
शाम हर सुरमई, रात बंसी का स्वर ।।

बात ऐसी नहीं कि कोई ग़म ही नहीं,
दर्द अपने-पराए कुछ कम भी नहीं ।

प्यार इतना परायों से मुझको मिला,
न अपनों से बाक़ी है कोई गिला ।।

हर चुनौती से दो हाथ मैंने किए,
आँधियों में जलाए हैं बुझते दिए ।

आज झकझोरता तेज़ तूफ़ान है,
नाव भँवरों की बाँहों में मेहमान है ।।

पार पाने का क़ायम मगर हौसला,
देख तेवर तूफ़ाँ का, तेवरी तन गई, ।।

ठन गई! मौत से ठन गई!
ठन गई! मौत से ठन गई!

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/- फक्त आहे. वार्षिक रु. २००/- तर त्रैवार्षिक रु. ५००/- वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## संपादकीय

**समस्त वाचकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनेक शुभेच्छा!**

परिस्थितीची अनुकूलता आणि प्रतिकूलता या मानवी आयुष्याच्या महत्वाचा घटक आहेत. बरेचजण अश्या प्रतिकूल परिस्थितीपुढे हतबुद्ध होतात आणि परिस्थितीला शरण जातात. महाकाय प्रतिकूलतेच्या छाताडावर पाय रोवून जे स्वतःचे तेज प्रकट करू शकतात ते आणि तेच या समाजाचा उद्धार करू शकतात. पण असे करण्याकरता विलक्षण मनःसामर्थ्य आणि झुंझार मनोवृत्ती असावी लागते त्याशिवाय संकटांवर मात करण्याची शक्ती प्राप्त होत नाही.

अश्याच झुंझार व्यक्तिमत्वातील एक अग्रणी नाव म्हणजे, डॉ.भीमराव रामजी आंबेडकर हे होय.

शूद्रातिशूद्र समजल्या गेलेल्या आणि हजारो वर्षांच्या अन्यायाने भरडून निघालेल्या, सदैव आर्थिक सामाजिक आणि धार्मिक मागासलेपणाचा मानवनिर्मित शाप लाभलेल्या ज्ञातीमध्ये जन्म घेतलेले डॉ.आंबेडकर जेंव्हा विश्ववंदनीय ठरतात तेंव्हा त्याला चमत्कार म्हणावे असे वाटते. पण हा काही कपोलकल्पित जादूची कांडी फिरवून घडलेला चमत्कार नव्हता तर त्यामागे कठोर, खडतर अशी तपश्चर्या होती. समाजाचा उद्धार करण्याकरता स्वतःच्या आयुष्याचा केलेला तो होम होता.

डॉ.आंबेडकरांच्या चरित्रामध्ये पदोपदी त्यांनी केलेला संघर्ष स्पष्ट दिसतो, संघर्षमय जीवनातही त्यांनी काही गोष्टी जपल्या होत्या. सात्विक, सत्शील आणि धार्मिक वृत्तीच्या माता पित्यांच्या सहवासामुळे, डॉक्टरांची वृत्ती देखील सत्शील आणि समतोल होती. वयाच्या सहाव्या वर्षी जरी मातृछत्र हरपले असले तरी आपल्या पुण्यशील मातेकडून मिळालेला सत्शीलतेचा वारसा त्यांनी अखेर पर्यंत जपला. त्याचप्रमाणे आपल्या पित्याकडून मिळालेली निर्व्यसनीपणाची शिकवण त्यांनी अखेरपर्यंत लक्षात ठेवली. यावरून हे स्पष्ट होते की, दैन्य आणि दारिद्र्य हे कधीच व्यसनाधीन होण्यास कारणीभूत ठरत नाहीत, व्यसनाधीनता हे केवळ मनाच्या कमकुवतपणाचे देणे असते.

विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी या वचनावर डॉक्टरांच्या वडिलांची अढळ श्रद्धा होती, तीच श्रद्धा त्यांनी आपल्या मुलांमध्ये रुजवली होती. त्यामुळे विद्याप्राप्तीचा ध्यास डॉ.आंबेडकरांना माध्यमिक विद्यायालात असतानाच लागला होता. परळ मधील डबक चाळीतील धुरकट, घरगुती वस्तुंनी ठासून भरलेली, एका कोपऱ्यात जळावू लाकडांचा साठा तर दुसऱ्या कोपऱ्यात चूल, कधी पायाशी एखादी बकरी धापा टाकत बसलेली असूनही डॉक्टरांनी आपला अभ्यास चिमणीच्या मिणमिणत्या प्रकाशावर निरंतर चालू ठेऊन मॅट्रिक परीक्षेत यश संपादन केले होते हे विशेषच आहे. केवळ परिस्थिती आणि संसाधने याची कारणे देणाऱ्या आळशी विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकरांचा विद्यार्थी दशेतील संघर्ष आदर्श मानावा असेच मला वाटते.

डॉ. आंबेडकरांच्या चरित्रातून मला भावलेली पुढील बाब म्हणजे, मिळालेल्या संधीचे सोने करणे.

बडोदा नरेश श्रीमंत सयाजी गायकवाड यांनी शिष्यवृत्ती देऊन डॉ.आंबेडकरांना अमेरिकेत पुढील शिक्षणासाठी जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. अमेरिकेसारख्या सुखलोलुप प्रदेशामध्ये गेल्यानंतर, विश्वविद्यालयीन विद्यार्थी सुखविलासात रमत असत परंतु आपल्याला मिळालेली संधी, ही सुखोपभोगासाठी नसून ती विद्याप्राप्तीसाठी आहे याचे पूर्ण भान आंबेडकरांना होते. शिष्यवृत्तीच्या पैश्यातून ते केवळ जीवनावश्यक आहार घेण्याकरता खर्च करीत आणि त्यातूनच काही रक्कम आपल्या पत्नीला पाठवत असत. यादरम्यान त्यांना १८–१८ तास अभ्यास करताना, हात आखडता ठेवून खर्च करताना पाहून नंतर त्यांचे सहकारी सांगत आयुष्यात मिळालेल्या या संधीचा भरपूर लाभ घेण्यासाठी प्रत्येक क्षण सोन्याचा मानून, अभ्यासासाठीच व्यतीत केला.धनाचा प्रत्येक कण योग्य ठिकाणी लावला शिक्षणाकरता बाहेर राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थानी आंबेडकरांचे अमेरिकेतील हे कष्ट मनावर कोरून ठेवावेत आणि उपलब्ध झालेल्या धनाचा सुयोग्य विनियोग करावा असाच संदेश यातून मिळतो.

डॉ.आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वातील पुढील पैलू म्हणजे, पत्रकारिता. विश्वद्यालयातून विद्या संपादन करताना त्यांना जाणवलेली एक महत्वाची बाब म्हणजे, भारतातील उपेक्षित, सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत ठरलेल्या समाजाचा जर उद्धार करायचा असेल तर, त्या समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे होय. त्याचप्रमाणे समाजामध्ये जागृती आणणे होय. याकरता त्यांनी मूकनायक आणि बहिष्कृत भारत ही नियतकालिके सुरु केली होती. विशेष म्हणजे या

नियतकालिकांचे सर्व अर्थकारण केवळ बाबासाहेबांची वैयक्तिक कमाई आणि थोडीबहुत लोकवर्गणी यावरच चालू होते.

बऱ्याचदा त्यांची पत्रे ही आर्थिक अडचणीत सापडत परंतु अश्या परिस्थिती देखील त्यांनी पत्रकारितेवरची निष्ठा ढळू न देता, आपले विचार निर्भीडपणे समाजापुढे मांडले. केवळ दांडगी वर्गणी मिळावी किंवा काही धनलाभ व्हावा या करता कधीही कसलीही तडजोड त्यांनी केली नाही. यावरून लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारितेचे त्यांनी ठेवलेले पावित्र्य समजते.

पत्रकाराचा निर्भीडपणा, भाषेवरील प्रभुत्व, कोणत्याही घटनेचे निष्पक्ष विश्लेषण याच प्रमाणे आपण ज्या व्यवसायात (प्रोफेशन) आहोत त्याच्या प्रति आवश्यक प्रामाणिकपणा जपणे आदी गुण बाबासाहेबांच्या पत्रकारितेमधून शिकण्यासारखा आहे.

अस्पृश्योद्धारक डॉ. आंबेडकर, हा त्यांचा पैलू जेंव्हा विचारात घेतला जातो तेंव्हा त्यातून त्यांच्या अनेक इतर पैलूंचेही दर्शन घडते, जसे की, उत्तम वक्ता, आंदोलक, धर्मचिकित्सक, समाजसुधारक ई.

सहस्त्रावधी श्रोत्यांपुढे जेंव्हा डॉ. आंबेडकर भाषण करत असत तेंव्हा ती भाषणे, अत्यंत सध्या सरळ आणि सोप्या शैलीमध्ये असत. समोरील श्रोत्यांवर छाप पाडावी म्हणून विनाकारण अलंकारीक किंवा शब्दांचे खेळ त्यांनी आपल्या भाषणातून केले नाहीत. स्पष्ट उच्चार, खणखणीत आवाज आणि मुख्य म्हणजे समाजाच्या नेमक्या प्रश्नांना हात घालण्याची सचोटी आणि समाजाबद्दलची तळमळ हीच त्यांच्या वक्तृत्वाची प्रमुख वैशिष्ठ्ये असत.

त्यांनी केलेली आंदोलने ही सर्वश्रुतच आहेत पण त्यातील महत्वाची बाब म्हणजे ही सर्व आंदोलने १०० टक्के अहिंसक आणि नियम पाळून केलेली होती. गुलामाला त्याच्या गुलाम असण्याची जाणीव करून द्या म्हणजे तो आपोआप बंड करून उठेल हेच तत्व त्यांनी समाजजागृतीसाठी अवलंबले होते. पण असे बंड करत असताना आपल्या आंदोलनाची झळ संबंध नसणाऱ्या सर्वसामान्य जनतेला बसणार नाही याचे भानही त्यांनी ठेवले होते. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा आंदोलन हे एक उदाहरणा दाखल घेता येईल. आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात आंदोलनद्वारे वाचा फोडणे हे गैर नाही परंतु असे करत असताना, सार्वजनिक मालमत्तेचे आणि निरपराध जनतेचे नुकसान होणार नाही याचे भान राखण्याची सद्सद्विवेकबुद्धी डॉ.आंबेडकरांकडून घेण्यासारखी आहे.

समाजसुधारक, धर्मचिकित्सक डॉ आंबेडकर या पैलूंचा विचार करता, डॉ.आंबेडकरांनी हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी परंपरा यांवर कडाडून हल्ला केलेला आढळतो. पण हा हल्ला करत असताना धर्मग्रंथातील केवळ समाजहितकारी नसणाऱ्या बाबींवरच त्यांनी आक्षेप घेतलेला दिसतो, डॉ.आंबेडकरांनी केलेले मनुस्मृतीचे दहन हे सर्वश्रुत आहे परंतु पुढे जाऊन हिंदू कोड बिल बनवताना बहुतेक कायदे हे मनुस्मृतीचे संदर्भ घेऊनच बनवले होते हे देखील विसरता येणार नाही. त्यामुळे त्यांचा विरोध हा काही आंधळा किंवा द्वेषभावनेतून निर्माण झालेला नसून समाजरचनेमध्ये, कायद्यांमध्ये कालानुरूप आवश्यक त्या सुधारणा व्हाव्यात याच करिता होता.

डॉ.आंबेडकरांच्या टीकांचे अर्धवट अर्थ काढून त्यातून जातीयवाद पसरवायचा प्रयत्न आजकाल चालू आहे. तथापी आंबेडकरांनीच शिकवलेल्या चिकित्सेचा अवलंब करून त्यांचे विचार आणि चरित्र यांचा साकल्याने विचार करावा.

यानंतर त्यांच्या स्थिरबुद्धी या पैलूचा विचार करूयात. आंबेडकर ज्या समाजामध्ये निपजले, वाढले त्या समाजावर हजारो वर्षांपासून त्यांच्याच धर्मबांधवानी अन्याय केला होता, माणूस असूनही माणूस म्हणून जगण्याचा त्यांचा अधिकारच हिरावून घेतला होता. खुद्द आंबेडकरांनी उच्चविद्या संपादित केल्यानंतरही या पाशवी वृत्तीचा अनुभव घेतला होता.

असे असूनही जेंव्हा म बहिष्कृत हितकारिणी सभा म या संस्थेची उभारणी करण्यात आली तेंव्हा त्यामध्ये सवर्ण समाजातील सदस्य घेण्यात आले. ज्यांना सामाजिक समरसतेचे भान होते अश्या प्रत्येक मनुष्यासाठी आंबेडकरांनी आपल्या मनाची आणि संघटनेची द्वारे नेहमीच खुली ठेवली होती ही बाब महत्वाची आहे.

जेंव्हा त्यांच्याकडे घटना समितीमध्ये कार्य करण्याची संधी मिळाली तेंव्हा त्यांनी सूडबुद्धीने, कोणत्याही समाजावर अन्यायकारक होईल असे संविधान मांडले नाही. त्यामुळे डॉ.आंबेडकर हे खुल्या मनाचे तसेच स्थिरबुद्धीचे व्यक्तिमत्व होते हे स्पष्ट होते.

डॉ.आंबेडकरांच्या एकंदरीतच चरित्राचा विचार करता ते एक महामानवच होते हे पदोपदी सिद्ध होते. थोर महापुरुष जसे राजवाड्यात जन्माला येतात तसे ते झोपडीतही जन्माला येतात. जसे तथाकथित उच्च कुलात जन्माला येतात तसेच सर्वसामान्य कुलात जन्माला येतात, आपल्या देशाला अनेक थोर महापुरुषांची अलौकिक परंपरा आहे, त्यामध्ये डॉ आंबेडकरांचे महत्व हे विलक्षण आहे कारण त्यांचा जीवनपट हा धुळीतून शिखराकडे जाणार आहे. त्यांचे संघर्षमय जीवन आणि अखेर मिळालेली जगन्मान्यता त्यांना विश्वरत्न डॉ.आंबेडकर असे संबोधायला भाग पाडते.

या अश्या महामानवाच्या तेजाचे कण सर्व भारतीय समाजाने बुद्धिप्रामाण्याच्या तत्वावर वेचून आपले राष्ट्र विश्वगुरू होण्याकरता हातभार लावावा एवढीच अपेक्षा करतो.

**श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी**



## नैतिक मूल्य शिक्षण अंतर्गत : हडपसर जिल्हा

नैतिक मूल्य शिक्षण अंतर्गत : कथारूप रामायण या विषयाला अनुसरण जानेवारीमध्ये परीक्षा घेतल्या होत्या. परीक्षा उत्तमरीत्या पार पडल्या.

विद्यार्थ्यांनी रामायण पुस्तक चांगल्या प्रकारे आत्मसात करून परीक्षेला सामोरे गेले व उत्तम प्रकारे गुण प्राप्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

आज हडपसर जिल्ह्यातील कवडी माळवाडी, लोणी काळभोर परिसरातील जिल्हा परिषद शाळा यामध्ये विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप केले. यावेळी तीनही शाळांमधील विशेष शिक्षक मुख्याध्यापक यांनी खूप चांगल्या प्रकारे सहकार्य केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत असताना सांगितले की, रामायणाबाबत आम्हाला काहीच माहिती नव्हती परंतु नैतिक मूल्य प्रतिष्ठान यांच्यावतीने जे कथारूप रामायण पुस्तक देण्यात आले. ते खूप सुंदर आणि ज्ञानामध्ये भर पडण्याकरिता खूप उपयुक्त आहे.

त्याचबरोबर शिक्षक व विद्यार्थी यांनी नैतिक मूल्य प्रतिष्ठान, यांचे आभार मानले. त्याचबरोबर पुढील वर्षी अशा उपक्रमामध्ये सहभाग घेणार असल्याचे बोलून दाखवले.

यावेळी सदर प्रमाणपत्र वाटप या सोहळ्याकरिता कवडी माळवाडी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री.संतोष जाधव, विशेष शिक्षक, श्री.संतोष लडकत, विशेष शिक्षिका सौ.वैशालीताई म्हेत्रे त्याचबरोबर लोणी काळभोर जिल्हा परिषद शाळा मुलांची शाळेचे मुख्याध्यापक, सौ. मीनाताई नेवसे, सौ.रूपालीताई सुर्वे व श्री.पृथ्वीराज काळे, तसेच लोणी काळभोर जिल्हा परिषद शाळा मुलींची शाळेचे मुख्याध्यापक, श्री.चंद्रकांत जगताप, उपमुख्याध्यापक सौ.मनीषाताई काळे, विशेष शिक्षिका, सौ.प्रभावतीताई पवार व पूजाताई शेटे यांचे विशेष सहकार्य लाभले.

आजच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्याकरिता हडपसर जिल्हा मंत्री, श्री. राजेंद्र शेवाळे, जिल्हा सहमंत्री, श्री.शशिकांत घाटे, कोषाध्यक्ष, श्री. राहुल मोडक हे विशेष करून उपस्थित होते.

श्री. राजेंद्र शेवाळे, मंत्री हडपसर जिल्हा


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**




## प्रेस वक्तव्य:

विहिप का सांसद संपर्क अभियान शुरू, २७ मार्च तक दोनों सदनों के सभी सांसदों से मिलकर तीन खास विषयों पर होगी विशेष चर्चा

नई दिल्ली। मार्च ११, २०२६। विश्व हिंदू परिषद का त्रि–साप्ताहिक सांसद संपर्क अभियान २७ मार्च तक चलेगा। विहिप के केंद्रीय महामंत्री श्री बजरंग लाल बागड़ा ने आज एक प्रेस वार्ता में बताया कि इसी सोमवार यानि ९ मार्च को प्रारंभ हुए विशेष सांसद संपर्क अभियान के अंतर्गत हम देश के दोनों सदनों के सभी सांसदों से मिलकर तीन ज्वलंत विषयों पर चर्चा करेंगे।

उन्होंने कहा कि हालांकि हर शीतकालीन सत्र के दौरान सांसद संपर्क हमारी वार्षिक योजना का एक हिस्सा है किंतु, इस वर्ष उस सत्र की अवधि कम होने के कारण बजट सत्र में यह आयोजित किया गया है। इस वर्ष हम कुछ विशेष विषयों को लेकर देश के कानून निर्माताओं से निवेदन करेंगे।

उन्होंने कहा कि वर्तमान समय में जनसंख्या असंतुलन पर एक व्यापक राष्ट्रीय चिंतन की आवश्यकता है। पिछली अनेक सरकारों ने इस बारे में अपने–अपने तरीके से काम किया लेकिन अब आवश्यकता इस बात की है कि इसकी बारीकियों पर चिंतन कर एक प्रभावी जनसंख्या नीति बने और नारी सशक्तिकरण, स्वास्थ्य सेवाओं के विस्तार तथा क्षेत्रीय और सांप्रदायिक जनसंख्या संतुलन नीतियों जैसे माध्यमों के साथ जन मन की सहभागिता से यह कार्य आगे बढ़े।

भारत धर्म प्राण देश है, जिसकी आत्मा तीर्थों में बसती है और तीर्थ विकास के बिना भारत के विकास की कल्पना अधूरी है। तीर्थ यात्राओं का देश की अर्थव्यवस्था में उल्लेखनीय योगदान है। इसलिए, हम सभी सांसदों से निवेदन करेंगे कि देश के तीर्थक्षेत्रों का समुचित विकास हो और वे भारत की अर्थव्यवस्था, संस्कृति और स्वाभिमान के केंद्र बिंदु बनकर, पुनः धर्म, आध्यात्म और मानव कल्याण के वैश्विक प्रहरी बनें। मंदिरों को सरकारी नियंत्रण से मुक्ति मिले, हिंदू का पैसा हिंदू हित में काम आए तथा तीर्थाटन के विकास के लिए संस्कृति मंत्रालय में एक स्वतंत्र विभाग का गठन कर इनका चहुंमुखी विकास हो।

तीसरे विषय के रूप में हम संविधान के अनुच्छेद २९ और ३० के प्रावधानों को देश के सभी नागरिकों के लिए समान रूप से लागू करने के लिए उनसे निवेदन करेंगे। जिससे कि सभी धर्मों को धार्मिक शिक्षा का भेदभाव रहित सामान संवैधानिक अधिकार सुनिश्चित हो सके। साथ ही अल्पसंख्यक को परिभाषित करने की आवश्यकता को भी रेखांकित करेंगे।

विहिप महामंत्री ने बताया कि यह अभियान तीन चरणों में होगा।अलग–अलग चरणों में देश के अलग–अलग प्रांतों से आए हुए कार्यकर्ता अपने–अपने क्षेत्र के सांसदों से राजधानी दिल्ली में संपर्क कर रहे हैं। पहला चरण ९ से १३ मार्च तक होगा और दूसरा १६ से २० मार्च तक। इसके बाद २३ मार्च से २७ मार्च तक इस अभियान का समापन सप्ताह होगा।

उन्होंने बताया कि हम बिना किसी राजनीतिक या विचार भेदभाव के हर दल के, हर मत पंथ संप्रदाय के और हर क्षेत्र के सांसद से मिलकर खुलकर अपनी बात उनके समक्ष रखेंगे।

प्रेस वार्ता में विश्व हिंदू परिषद के केंद्रीय मंत्री तथा अखिल भारतीय विशेष संपर्क प्रमुख श्री अंबरीश सिंह भी मौजूद थे।

**जारी कर्ता: विनोद बंसल**
**राष्ट्रीय प्रवक्ता – विश्व हिंदू परिषद**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता वेल्फेअर सोसायटी**



# सांसद संपर्क अभियान २०२६

विश्व हिंदू परिषद – विशेष संपर्क विभाच्या वतीने, सांसद संपर्क अभियान २०२६ अंतर्गत दिल्ली येथे लोकप्रतिनिधींशी संवाद

विहिंपच्या विशेष संपर्क विभागाच्या माध्यमातून दरवर्षी देशभरात सांसद संपर्क अभियान राबवले जाते. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे लोकप्रतिनिधींशी प्रत्यक्ष संवाद साधून समाजहित व राष्ट्रहिताशी संबंधित विविध महत्वपूर्ण विषयांवर चर्चा करणे हा आहे. या वर्षीही दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या या अभियानाच्या अंतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधी तसेच केंद्र सरकारमधील विविध पदाधिकाऱ्यांची भेट घेण्यात आली.

या भेटीदरम्यान राष्ट्रजीवनाशी निगडित अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. समाजातील विविध घटकांच्या अपेक्षा, हिंदू समाजासमोरील आव्हाने, सामाजिक समरसता, भारतीय संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन, तसेच राष्ट्राची एकात्मता आणि सुरक्षा यांसारख्या मुद्द्यांवर विचारविनिमय करण्यात आला.

विहिंप गेल्या अनेक दशकांपासून समाजजीवनाशी संबंधित विविध विषयांवर रचनात्मक भूमिका घेत आहे. समाजातील प्रश्न शासन व लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचावेत आणि त्यावर सकारात्मक धोरणात्मक निर्णय व्हावेत यासाठी परिषद सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने सांसद संपर्क अभियान हे एक महत्त्वाचे माध्यम ठरत आहे. या अभियानाच्या माध्यमातून संसद सदस्यांशी संवाद साधून समाजाच्या अपेक्षा, समस्या आणि मागण्या थेट मांडण्याचे कार्य परिषद सातत्याने करत आहे.

संसदेच्या चालू अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या अभियानाच्या अंतर्गत काही महत्वपूर्ण विषय लोकप्रतिनिधींसमोर मांडण्यात आले. त्यामध्ये प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत –

**१. मंदिरे सरकारी नियंत्रणातून मुक्त करणे :** देशातील अनेक हिंदू मंदिरे आजही सरकारी नियंत्रणाखाली आहेत. मंदिरांची संपत्ती आणि उत्पन्न हे मंदिर व्यवस्थापन, धार्मिक परंपरा आणि हिंदू समाजाच्या हितासाठीच वापरले जावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास, व्यवस्थापन आणि संवर्धन यासाठी केंद्र सरकारच्या स्तरावर स्वतंत्र तीर्थाटन मंत्रालय स्थापन करण्यात यावे अशीही मागणी करण्यात आली.

**२. जनसंख्या नियंत्रणासाठी समान कायदा :** देशामध्ये लोकसंख्या संतुलन राखणे हे राष्ट्रीय विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्व समाजघटकांसाठी समानपणे लागू होईल असा जनसंख्या नियंत्रण कायदा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. या माध्यमातून लोकसंख्येतील असंतुलन टाळणे आणि दीर्घकालीन सामाजिक व आर्थिक स्थैर्य राखणे शक्य होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

**३. संविधानातील कलम २९ आणि ३० संदर्भात समानता :** भारतीय संविधानातील कलम २९ आणि ३० अंतर्गत असलेल्या तरतुदी सर्व नागरिकांना समानपणे लागू व्हाव्यात, अशी मागणी करण्यात आली. कोणत्याही धर्माला किंवा समाजघटकाला विशेष किंवा वेगळा लाभ न देता सर्वांना समान संवैधानिक अधिकार मिळावेत, अशी भूमिका मांडण्यात आली. याचबरोबर 'अल्पसंख्याक' या संज्ञेची स्पष्ट व्याख्या करण्याची आवश्यकता देखील अधोरेखित करण्यात आली, जेणेकरून देशातील सर्व धर्मांना कोणत्याही भेदभावाशिवाय धार्मिक आणि शैक्षणिक अधिकारांचा समान लाभ मिळू शकेल. या सर्व विषयांवर केंद्र सरकारने सकारात्मक विचार करून आवश्यक ते कायदे करावेत तसेच विद्यमान कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, अशी विनंतीही लोकप्रतिनिधींना करण्यात आली. या संवादादरम्यान राष्ट्रीय एकात्मता अधिक मजबूत करणे, भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे, तसेच समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी प्रभावी धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. लोकप्रतिनिधींनीही या सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या प्रकारच्या विधायक संवादामुळे समाजाच्या अपेक्षा थेट संसद आणि शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होते. तसेच राष्ट्रहिताच्या विविध विषयांवर सखोल चर्चा होऊन सकारात्मक धोरणात्मक निर्णय घडून येण्यासही हातभार लागतो. त्यामुळे अशा प्रकारचे संवाद अभियान समाज आणि शासन यांच्यातील सेतू म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या अभियानात पश्चिम महाराष्ट्र मधील पदाधिकारी उपस्थित होते. श्री. श्रीकांत पोतनीस – विशेष संपर्क प्रमुख पश्चिम महाराष्ट्र प्रांत, श्री. सतीश गोरडे– प्रांत सहमंत्री, श्री. अशोक रामचंदानी,प्रांत टोळी सदस्य त्याचबरोबर विशेष संपर्क जिल्हा प्रमुख म्हणून कु. विवेक गिरी– छत्रपती संभाजी भाग,पुणे, श्री. प्रवीण जिला– सोलापूर विभाग, श्री. राजन गुणे– कोल्हापूर, श्री. योगेश मखाना– शिर्डी, श्री. अमोल डोंगरकर–कोल्हापूर या सर्वांच्या उपस्थित हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले.

**वृत्तांकन: कु. विवेक राजेंद्र गिरी**
**विशेष संपर्क प्रमुख,छत्रपती संभाजी भाग, पुणे महानगर.**

## ॥ श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ॥

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि;

## श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे – ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

### कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✼ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✼ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
- ✼ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✼ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
- ✼ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✼ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✼ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

### संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

### – मुख्य कार्यालय –

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# जानकी

**चैत्र मास त्यात नवमी तिथी...**
**राम जन्मला ग बाई राम जन्मला**

श्रीरामांच्या विजयपताकाची गुढी लेऊन चैत्र पाडव्याचे आगमन सर्वत्र होते. पाठोपाठ चैत्र शुद्ध नवमीस राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होतो. याच श्रीरामांची अर्धांगिनी श्रीसीतामाईची तिथी ही नवमीच! वैशाख शुद्ध नवमी! राजा जनकाला ही भूमी कन्या पेटी मध्ये सापडली ती ही तिथी!

त्या सुरूप बालिकेला बघून राजा जनकाच्या मनात वात्सल्य दाटून आले. राजाने तिला आपली पुत्री मानले. अशा रीतीने राजा जनकाची पुत्री 'जानकी' म्हणून ती ओळखली जाऊ लागली.

**अथ मे कृषत: क्षेत्रं लांगुलादुत्थिता तत: ।**
**क्षेत्रं शोधयता लब्धा नाम्ना सीतेति विश्रुता ।।**
**भूतलादुत्थिता सा तु व्यवर्धत ममात्मजा ।**
**वीर्यशुल्केति मे कन्या स्थापितेऽयमयोनिजा ।।**

**– बालकाण्ड, सर्ग ६६**

सीता भूमी मधे सापडल्यामुळे ती खऱ्या अर्थाने भूमीकन्या आहे, असे म्हटले आहे.

आपल्या राज्यात कोणी अनाथ असू नये ह्याची जाणीव ठेवून तिला ज्येष्ठ कन्येचा मान देऊन जबाबदारी समर्थपणे पेलणारा एक आदर्श पिता ही जनकराजामध्ये दिसतो.

सीतेचा उपनयन झाले असून ती सायंसंध्या ही करत असायची याचे उल्लेख ही वाल्मिकी रामायणामध्ये आढळतात.

**संध्याकालमना: श्यामा ध्रुवमेष्यति जानकी ।**
**नदीं चेमां शुभजलां संध्यार्थे वरवर्णिनी ।।**
**– सुन्दरकाण्ड १४ सर्ग ४९ श्लोक**

रामराज्य यावे असे म्हणताना मुलींना धर्मशिक्षित करणे हे पित्याचे, समाजाचे आद्य कर्तव्य व्हायला हवे.

सीता स्वयम्वर हे सद्य अर्थाने तिने निवडलेला पति या अर्थाने नाही तर जनकाने सीतेच्या विवाहासाठी सुयोग्य वर तिला मिळावा यासाठी शिवधनुष्य सज्ज करण्याचे वीर्यशुल्क (वीरतारुपी शुल्क) स्वयंवरासाठी लावले होते. समाजानी आदर्श ठेवावा अशीच राजा जनकाची भूमिका दिसते.

आपल्या कन्येस गुणी, संस्कारशील, वैदिक धर्म शिक्षणाने ज्ञानी बनवून तिच्या अंगभूत गुणांना न्याय देणारा सुयोग्य वर तिजसाठी शोधणारा, अनेक राजांकडून सीतेसाठी मागणी आलेली असून सुद्धा तिच्या योग्य वराची वाट पाहणारा पिता हा आदर्श सर्व वधूपित्यांसाठी नक्कीच आहे. अशा आदर्श मातापित्यांचे संस्कारछत्र लाभलेली सीता अर्थातच परम तेजस्वी, स्वाभिमानी, धर्माचरणी विदुषी होती.

**प्रिया तु सीता रामस्य दारा: पितृकृता इति ।**
**गुनाद्रूपगुणाच्चाािपि प्रीतीर्भूयाािभिवर्धते ।।**
**तस्याश्च भर्ता द्विगुणं हृदये परिवर्तते ।**
**अन्तर्गतमपि व्यक्तमाख्याति हृदयं हृदा ।।**
**तस्य भूयो विशेषेण मैथिली जनकात्मजा ।**
**देवताभि: समा रूपे सीता श्रीरिव रूपिणी ।।**

**– बालकाण्ड, सर्ग ७७**

वडीलधाऱ्यांच्या आशिर्वादाने जिची प्राप्ती झाली ती अतिशय प्रिय असलेली सीता रामाची पत्नी झाली. आपल्या सुन्दर रूपाने व उच्च गुणाने तिने रामाच्या हृदयात स्वत:विषयी प्रीती वृद्धिंगत केली. मूर्तिमंत लक्ष्मीसारखीच असणारी ती देवी सीता रामाच्या मनातील अव्यक्त भाव ही न बोलता जाणत असे, जसे रामाच्या हृदयाशी तिचे हृदयच जोडलेले असावे.

रामाच्या राज्याभिषेकाची वार्ता ऐकून अतिशय हर्षोल्हासित झालेली जानकी त्याच्या वनवासात जाण्याविषयी कळल्यावर अचंबित होते, दु:खी होते. परंतु तरिही त्या दोघांमधील संवाद सीतेविषयी आदर वृद्धिंगत करतो.

राम तिला वनवासात जाण्याविषयी तिला सांगतात. तिने येथेच राहून सर्वांची काळजी घ्यावी, स्वत:च्या हातून कोणाचेही अप्रिय होऊ नये असे वर्तन तिने ठेवावे असे तिला सुचवितात.

श्रीरामांचे भाषण ऐकून सीता त्यांना सांगते,

**किमिदं भाषते राम वाक्यं लघुतया ध्रुवम् ।**
**त्वया यदपहास्यं मे श्रुत्वा नरवरोत्तम ।।**
**आर्यपुत्र पिता माता भ्राता पुत्रस्तथा स्नुषा ।**
**स्वानि पुण्यानि भुंजाना: स्वं स्वं भाग्यमुपासते ।**
**भर्तुभाग्यं तु नार्येका प्राप्नोति पुरुषर्षभ ।**
**अतश्चैवाहमादिष्टा वने वस्तव्यमित्यपि ।।**

**– अयोध्याकाण्ड , सर्ग २७**

'हे नरोत्तम श्रीराम, आपले हे थटटेत केलेले भाषण ऐकून मला हसूच येते आहे. हे आर्यपुत्र, माता पिता बन्धु पुत्र स्नुषा हे सर्व आपल्या कर्मांना उपभोगतात आणि आपल्याच भाग्यावर अवलम्बून असतात. परन्तु, पत्नीला मात्र पतीच्या भाग्याची भागीदारी प्राप्त होते. जर वनात जाण्याची आज्ञा आपल्याला झाली असेल तर ती मला ही माझ्यासाठी ही आहे.

परंतु, तरीही श्रीराम तिला वनात न येण्याविषयी सुचवितात. वनात अनेक असुविधा होतील. तू एक राजकुमारी आहेस. वनातील दगदग सहन करणे तुजसाठी सोपे नसणार. अनेक हिंस्त्र जनावरांना सामोरे जावे लागेल. राक्षसांचा सामना करावा लागेल. विपरीत वातावरण, हवामान सोसावे लागेल असे ही सांगतात.

त्यावर सीता श्रीराम सहज वनात नेण्यास तयार होणार नाहीत हे ओळखून त्यांच्या शौर्याला ललकारते, पौरुषत्वावरच बोट दाखवते.

**किं त्वाीमन्यत वैदेह: पिता मे मिथिलाधिप: ।**
**राम जामातरं प्राप्य स्त्रियं पुरुषविग्रहम् ।।**

**– अयोध्याकाण्ड सर्ग ३०**

रामा, जर आपण मला वनात नेले नाही तर विदेह राज्याचे राजा असलेले मिथिलाधीश म्हणजेच माझे पिता यांना शङ्का येईल की पुरुषरूप धारण केलेला पण मुळ स्त्रीरुपी असा जावई मिळाला की काय??

त्यामुळे तुमच्या सामर्थ्यावर कोणीही प्रश्न उठवू नये यासाठी मला आपणासमवेत वनात यावेच लागेल.

सीतेच्या बुद्धीसामर्थ्याने, वाकचातुर्याने स्तिमित व आपल्यावरील तिच्या दृढ श्रद्धेने प्रसन्न झालेले श्रीराम तिला वनात येण्यास संमति देतात. राजकुमारी असल्याने वल्कले कशी नेसावी माहिती नसल्याने तिला वल्कलेही नेसवून देतात.

अशी वल्कले नेसलेली सीता पाहून राजा दशरथ, गुरु वसिष्ठ, सर्व राण्यांना अतीव दु:ख झाले. हे सर्व पाहून वसिष्ठ कैकेयीस म्हणतात, हे दुर्प्रवृत्त कैकेयी, सीतेला वनात पाठविण्याविषयी मागणी तू केली नाहीस. तर तिने वल्कले का नेसली? सीता वनात जाणार नाही. रामाला प्राप्त होणारे सिंहासनाचा स्वीकार सीता करील, राम येई पर्यन्त ती राज्य करेल. पत्नी हा पतिचा आत्मा आहे. त्यामुळे सीता ही रामाचा आत्माच असल्याने राम परत येईपर्यन्त ती राज्य करेल.

**अतिप्रवृत्ते दुर्मेधे कैकेयि कुलपांसानि ।**
**वंचयित्वा तु राजानं न प्रमाणीवतिष्ठसि ।।**
**न गन्तव्यं वनं देव्या सीतया शीलवर्जिते ।**
**अनुष्ठास्यति रामस्य सीता प्रक्रुत्मासनम्।।**
**आत्मा हि दारा: सर्वेषां दारसंग्रहवर्तिनाम।**
**आत्मेयमिति रामस्य पालयिष्यति मेदिनीम्।।**

**– अयोध्याकाण्ड , सर्ग ३७.**

इतकी अनेक कर्तव्य प्रलोभने असून ही सीता श्रीरामांशिवाय एक दिवस ही सुखाने राहु शकणार नाही असे सांगुन वनात जाण्याविषयीच आग्रह धरते. श्रीरामांप्रति केवळ पतिप्रेम नाहीतर तिचा अनन्यभाव ती सर्वासमोर ठेवते.

अखेर सर्वांच्या आग्रहाने सालंकृत वनात जाण्यास तयार झालेली श्रीरामाची अर्धान्गिनी पाहून सासू कौसल्या तिला प्रेमाने कवटाळुन तिला सांगते,

**असत्य: सर्व लोकेीस्मिन्सततं सत्कृता प्रियै: ।**
**भर्तारं नानुमन्यते विनिपातगतं स्त्रिय: ।।**
**एष स्वभावो नारिणामनुभूय पुरा सुखम् ।**
**अल्पामप्यापदं प्राप्य दुष्यन्ति प्रजहत्यपि ।।**
**असत्यशीला विकृता अह्रदया सदा ।**
**असत्य: पापसंकल्पा: क्षणमात्र विरागिण: ।।**
**साध्विनां तु स्थितानां तु शीले सत्ये श्रुते स्थिते ।**
**स्त्रीणां पवित्रं परमं पतिरेको विशिष्यते ।।**
**स त्वया नावमन्तव्य: पुत्र: प्रव्राजितो वनम् ।**
**तव देवसमत्स्त्वेष निर्धन: सधनोऽपि वा।।**

**– अयोध्याकाण्ड सर्ग ३९**

नेहमी प्रिय वस्तु प्राप्त होण्याची सवय असणार्या स्त्रीया संकटात सापडलेल्या पतीची शुश्रूषा करत नाहीत. त्याची हेळसाण्ड करतात. पूर्वी सुख अनुभवलेल्या स्त्रीया थोडी जरी विपरीत परिस्थिती आली तर त्याचा त्याग करण्यास प्रवृत्त होतात. अशा दुष्ट, पतिवर क्षणमात्र विराग करणार्या असत्यभाषिणी, दुश्शिल स्त्रीया असतात. पण शीलवान स्त्रीचे पती हेच परम पवित्र स्थान आहे. त्यामुळे वनात धाडल्या गेलेल्या माझ्या या पुत्राचा कधी अवमान करु नकोस. तो निर्धन असो वा सधन नेहमी त्याला देवतुल्य जाण.

श्रीरामांच्या बरोबरीने वनात जाण्याआधीच सीतेची सत्व परिक्षा सुरु झालेली दिसते. त्या सर्व परिक्षांना ती अत्यन्त धीराने, चातुर्याने, सक्षमपणे इतक्या कमी वयात ही परिपक्वतेने सामोरी जाताना दिसते. खरतरं, कोणत्याही स्त्रीला आपल्या सासूचा हा उपदेश ऐकून क्रोध आला असता, पण त्याही परिस्थितीत सीता कणखरपणे व शान्तपणे आपली बाजु मांडताना ती म्हणते,

**करिष्ये सर्वमेवाहमार्या यदनुशास्ति माम् ।**
**अभिज्ञास्मि यथा भर्तुर्वर्तितव्यं श्रुतं च मे ।।**

**न मामसज्ज्नेनार्या समान्यितुमर्हति ।**
**धर्माद्विचलितुं नाहमलं चन्द्रादिव प्रभा ।।**
**साहमेवन्ता श्रेष्ठा श्रुतधर्मपरावरा ।**
**आर्ये किमवमन्येयं स्त्रिया भर्ता हि दैवतम् ।।**

**– अयोध्याकाण्ड सर्ग ३९**

आपण मला जो उपदेश करीत आहात त्याचे पालन मी नक्कीच करीन. पतिशी कसे वागावयास हवे ते मला ठाऊक आहे. आपण दुष्ट स्त्रीयांशी माझी बरोबरी करु नये. मी माझ्या धर्मापासून विचलित होणार नाही. पती हेच स्त्री चे दैवत असताना मी कसा बरे त्यांचा अवमान करेन?

अशा प्रकारे सर्वांचे शङ्कानिरसन करून पतीकर्तव्य परायण होऊन सीता वनवासात श्रीराम लक्ष्मणासमवेत जायला निघते.

वनात आल्यानंतर अनुसूया व सीता संवाद अतिशय मनाला भावणारा आहे. अनुसूया जणु सीतेच्या मनावर आपल्या सुवचनांनी मायेची पाखर घालतात. तिला येणाऱ्या संकटासाठी मानसिक बळ देतात. पथदर्शन करतात.

त्या तिचे धर्माचे पालन करून पतीची साथ देण्यासाठी कौतुक करतात. धर्मभ्रष्ट स्त्रीयांप्रमाणे न वागता गुणसंपन्न स्त्री बनून कर्तव्यनिष्ठतेने पतीसेवेत राहण्यासाठी तिला आशिर्वाद देतात. तिच्या विवाहाची हकीकत सांगण्यास सांगतात.

आपल्या गुणसंपन्नतेमुळे प्रशंसेस पात्र असणाऱ्या, जितेन्द्रिय, दयाळु, मजवर अढळ प्रेम करणाऱ्या माझ्या पतीशी एकनिष्ठपणे वागणे आवश्यक आहे यात शङ्का कसली असे सांगुन आपल्या विवाहाची कहाणी अनुसुयेस सांगते. पण जिंकल्यावर ही श्रीराम आपल्या पित्याच्या आज्ञेसाठी थांबले व त्यानंतरच त्यांनी सीतेसह विवाह केला. हे ऐकून अत्यंत आनंदित झालेल्या अनुसूया तिला वर मागण्यास सांगतात. परंतु अतिशय निर्मोही सीता आपल्या कृपेने सर्व ठीक आहे असे सांगून वराची अपेक्षा नाही असे सांगते. ह्यामुळे अधिक प्रसन्न झालेल्या अनुसूया सीतेला श्रेष्ठ वस्त्राभूषणे, अनुलेपन, माला देतात.

वनात श्रीराम व सीता यांच्या धर्म – अधर्म या विषयींच्या चर्चांचा उल्लेख ही वाल्मीकि रामायणात येतो.

**क्व च शस्त्रं क्व च वनं क्व च क्षात्रं तप: क्व च ।**
**व्यविद्धमिद्मस्माभिर्देशधर्मस्तु पूज्यताम् ।।**
**कदर्यकलुषा बुद्धिर्जायते शस्त्रसेवनात् ।**
**पुनर्गत्वा त्वयोध्यायां क्षत्रधर्मं चरिष्यसि ।।**
**धर्मादर्थ: प्रभवति धर्मात्प्रभवते सुखम् ।**
**धर्मेण लभते सर्वं धर्मसारमिदं जगत ।।**

कुठे शस्त्र कुठे वनगमन, कुठे क्षात्रतेज तर कुठे तप:श्चर्या! कमापासुन तीन व्यसने उत्पन्न होतात. पहिले म्हणजे मिथ्याभाषण, दुसरे परस्त्रीसेवन. हे दोन्ही आपल्या ठायी नाही. पण तिसरे व्यसन वैराशिवाय हत्या करणे हे मात्र तुमच्या ठायी दिसते. जेथे तप:श्चर्या करायाची तेथे धनुष्य बाण घेऊन आपण राक्षसांची हत्या करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. वनात येऊन ऋषिमुनिंप्रमाणे वागण्यात अर्थ आहे, परत जाऊन अयोध्येत क्षात्रधर्माचे पालन करणे योग्य नाही का ? धर्माने अर्थ प्राप्ती होते धर्मानेच सुखप्राप्ती होते, धर्मानेच सर्व लाभत असल्याने धर्मच सार्याचे सार नाही का!

आपल्याला हा स्त्री सुलभ उतावीळ स्वभावाने हा प्रश्न विचारते आहे, तसे तर तुम्हाला उपदेश करण्यायोग्य कोण आहे? तरीपण आपल्याला योग्य वाटल्यास आपण विचार करावा.

यावर अजिबात न रागावता श्रीराम तिला समजावतात, राक्षसांमुळे ऋषिमुनिंचे रक्षण होत नसल्यामुळे त्यांच्या इच्छेसाठी मला शस्त्र धारण करायला हवे. त्यांचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य आहे. म्हणून मी माझ्या प्रतिज्ञेचे पालन करीत आहे.

**अप्यहं जीवितं जह्यां त्वां वा सीते सलक्ष्मणाम् ।**
**न तु प्रतिज्ञां संसृत्य ब्राह्मणेभ्यो विशेषत: ।। –**

**अरण्यकाण्ड सर्ग १०**

हे सीते, एकवेळ मी स्वतःच्या जीविताचा त्याग करेन, तुझा किंवा लक्ष्मणाचा त्याग करेन, पण माझी प्रतिज्ञा मोडणार नाही.

हे सीते, तुझे माझ्यावर अतिशय प्रेम असल्याने मोकळेपणाने आपला विचार सांगितलास. त्यामुळे तू मला जास्त आवडतेस.

श्रीरामानी सीतेला विवाहसमयीच एकपत्नी व्रती होण्याचे वचन दिले होते. सीतेच्या गुणांमुळे ती राघवास अधिकच प्रिय होत गेली.

सीताहरणानंतर ही रावणाला न घाबरता ती वाचण्याचे उपायशोधत राहिली, मदत मागत राहिली. जटायुचे पन्ख कापल्यावर आक्रोश करत राहिली. दागिन्याचे गाठोडे परिस्थितिचे भान ठेवून खाली टाकले. रामाच्या शौर्याची भीति रावणाला दाखवत राहिली.

अशोकवनात सीतेला ठेवून कामवासनेने परत परत तिच्या सौन्दर्याचे कौतुक करणार्या, आपले ऐश्वर्य दाखवून तिला तिचा दास झालोय असे सांगणाऱ्या रावणाला तृण हातात धरून शापभय देत रामाच्या कर्तुत्वाचे तेजस्वितेचे भय सीता दाखवत राहिली. रामाला शरण जा ते दयाळु आहेत तुला क्षमा करतील हे सांगत राहिली.

सीतेचे भाषण ऐकून रावण तिला म्हणाला– पुरुष जितका स्त्रीचे सांत्वन करतो तितका तिला तो आवडतो. पण मी तुला प्रिय वाटावे यासाठी जितके भाषण करत आहे तितका तू माझा अनादर करीत चालली आहेस. हे सुन्दरी, २ महिन्यात जर तुझा पती तुला न्यायला आला नाही तर तुला माझा पती म्हणून स्वीकार करावा लागेल नाही तर तुझे तुकडे करून त्याने न्याहारी करीन.

**छिन्ना भिन्ना प्रभिन्ना वा दीप्तावाग्नौ प्रदीपिता ।**
**रावणं नोपतिष्ठेयं किं प्रलापेन वश्चिरम् ।।**

**– सुन्दरकाण्ड सर्ग २६.**

माझे तुकडे केले वा मला आगीत जाळाले तरी मी रावणाचा स्वीकार करणार नाही. सीतेच्या आत्यन्तिक धैर्याचा, सत्वाचा कसच येथे लागलेला दिसतो.

हनुमानाची भेटीत श्रीरामांची अंगठी पाहून श्रीरामांना भेटल्याचा भास होऊन तिला धीर येतो. आपल्या जवळचा मणी ओळखीसाठी देताना ती मारुतीराया पाशी निरोप देते की एखाद महिनाच मी जिवन्त राहेन. त्याआधी मला सोडवून घेऊन जावे.

तिच्या सुस्वभावाने तिने राक्षसींच्या मनात ही तिच्याविषयी आदर, मैत्र निर्माण केले. त्यामुळेच रावणाने मायावीपणे रामाचे मस्तक तिच्या समोर आणले तेव्हा दु:खातिरेकाने कासावीस सीतेला त्रिजटेने रावणाच्या मायेविषयी सांगितले. इन्द्रजीतने मूर्च्छित राम लक्ष्मण पुष्पक विमानातून दाखविल्यावर मात्र पुरती खचलेली सीता विलाप करु लागली तेव्हाही सुरमा नावाच्या राक्षसीने तिलासमजावले.धीर सोडु नये हे सांगितले. युद्ध वार्ता तिच्या पर्यन्त पोहोचवीत राहिल्या.

रावण वधानंतरही वनवासाची १४ वर्षे कोणत्याही नगरीत न गेलेले राम लंकेत ही आले नाहीत. लक्ष्मणाच्या हातून बिभिषणास राज्याभिषेक केला. त्यावेळी ही हनुमानाने सीतेची सुटका करून तिची इच्छा विचारली असता सीतेने श्रीराम दर्शनाची इच्छा व्यक्त केल्यानंतर श्रीरामाने तिला स्नानोत्तर दिव्यअलंकार धारण करून मगच येण्यास सांगीतले. किती परिक्षा धैर्याच्या द्याव्यात एखाद्या स्त्रीने...!

पालखीत बसून आलेली जानकी उतरून मोठ्या आनन्दाने श्रीरामांचे मुखावलोकन करु लागली. सीतेला नजरभर पाहून राम तिला म्हणाले,

हे कल्याणी, स्त्रीहरणरुपी अपमानाचा बदला मी घेतला आहे. तू तुला हवे तिथे जाण्यासाठी मोकळी आहेस. रावणाच्या अंगाचा स्पर्श झालेल्या आणि त्याने दोषदृष्टीने अवलोकन केलेल्या तुझा स्वीकार मी कसा करु?

रावणाच्या गोड बोलण्यावर आणि त्याच्या साधुरूपावर विश्वास ठेवल्यामुळे जे भोग जानकीच्या नशिबी आले, त्याचे प्रायश्चित घेणे गरजेचे होतेच.

त्यामुळे रामाची वचने ऐकून अत्यंत लज्जित सीतेने अश्रूपूर्ण चक्षुंनी रामास म्हणाली पराधीन झाल्यामुळे मला जो परपुरुषाचा स्पर्श झाला तो माझ्या इच्छेने झाला नाही. शरीर माझ्या स्वाधीन नाही पण हृदयात मात्र आपलाच वास आहे. हनूमानाला मला शोधायला पाठवले तेव्हाच कळवले असते तर मी तेव्हाच प्राणत्याग केला असता. तुम्हाला जीव धोक्यात घालून युद्ध करावे लागले नसते. मिथ्यापवादाने ग्रस्त झालेले असताना मला जीवन्त राहण्याची इच्छा नाही!

असे म्हणून जानकीने चितेमध्ये प्रवेश केला.

यथा मे हृदयं नित्यं नापसर्पति राघवात् ।

तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः ।। – युद्धकाण्ड सर्ग ११६.

नित्य पती स्मरणात रत त्या पतीव्रतेला अग्नीही जाळू शकला नाही. तिच्या विषुद्धतेची साक्ष देत तो ही शान्त झाला.

विशुद्धा त्रिषु लोकेषु मैथिली जनकात्मजा ।

न विहातुं मया शक्या कीर्तिरात्मवता यथा ।। – युद्धकाण्ड सर्ग ११८

तीनही लोकात आपले पावित्र्य जिने सिद्ध केले आहे अशा मैथिलीस ज्याप्रमाणे कीर्तिला आपल्यापासून वेगळे करता येत नाही त्याप्रमाणे मी वैदेहीस माझ्या पासून वेगळे करु शकणार नाही असे सांगून सीतेला स्वीकारले.

लोकापवाद भल्याभल्यांना धराशायी करतो विशेषतः स्त्रीयांना ह्याची फार मोठी अग्निपरिक्षा द्यावी लागते. आपल्या दहाही इन्द्रियांना वश करणार्या दाशरथि रामाला ही जिने आपल्या विरहात व्याकुळ करण्याचे सामर्थ्य आपल्या अनन्य भक्तिने साधले, पत्नी हा पतीचा मानबिन्दु असते ह्याची जाण ठेवून आपल्या विशुद्धतेने, पावित्र्याने जिने तो जपला, पुरुषोत्तम श्रीरामासोबत आपल्या सात्विक आचरणाने समाजासमोर आदर्शवत् स्त्री हा बहुमान जिने प्राप्त केला, प्रसंगी पतीच्या शौर्याला ललकारणार्या , मानिनी सीतेस त्रिवार वन्दन!!

– **सौ. अरुंधती पंडीत.**

**संदर्भ – १.वाल्मिकि रामायण**
**२. रामायणातील व्यक्तिदर्शन , न्या. राम केशव रानडे.**

# आद्य राष्ट्रसंत समर्थ श्री रामदासस्वामी

ज्यांनी संत असूनही स्वत:ला समाज आणि राष्ट्रकार्याला वाहून घेतले आहे, त्यांना आपण राष्ट्रसंत म्हणतो. अशाच राष्ट्रसंतांचे आद्य पुरुष म्हणजे आपले चरित्र नायक समर्थ श्री रामदासस्वामी महाराज.

त्यांचा जन्म अत्यंत सात्विक आणि धर्मपरायण ठोसर घराण्यात, सूर्याजीपंत आणि आई राणूबाई यांच्या पोटी चैत्र शुद्ध नवमी शके १५३० (सन १६०८) रोजी झाला. नारायण हे त्यांचे जन्मनाम. वयाच्या ५व्या वर्षी त्यांची मुंज झाली. जन्मत:च अत्यंत प्रज्ञावान असलेल्या या मुलाचे अध्ययन लवकरच पूर्ण झाले. त्याबरोबरच वेळोवेळी सूर्यनमस्कार, मल्लविद्या यांचा अभ्यास करून त्याने आपले शरीर कणखर बनवले.

नारायणाचे थोरले बंधू गंगाधरपंत उर्फ श्रेष्ठ यांना प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांचा अनुग्रह झाला होता. त्यामुळे नारायणाने एक दिवस मलाही अनुग्रह द्यावा असा त्यांच्याकडे हट्ट धरला. त्यावेळी श्रेष्ठ यांनी ‘तुझे वय अजून लहान आहे, त्यामुळे अनुग्रह देता येत नाही’ असे सांगितले. त्यावर रुसून नारायनाने गावातल्या मारुतीच्या देवळात अनुष्ठान करून त्याच्याकडे आपले गाऱ्हाणे घातले. संत नामदेवांसारख्या त्यांच्या भक्तीभावाने संतुष्ट होऊन मारुतीरायांच्या कृपेने नारायणाला प्रभू रामचंद्रांचे दर्शन आणि अनुग्रह होऊन ‘श्रीराम जयराम जयजयराम’ हा मंत्रही मिळाला.

अनुग्रहानंतर नारायण एकांतात राहून ध्यानधारणा आणि जप यांच्यामध्ये सदैव मग्न राहू लागला. त्यामुळे या मुलाचे कसे होणार याची काळजी वाटून राणूबाईंनी, त्यांना मार्गी लावण्यासाठी लग्नाचे प्रयत्न सुरू केले. परंतु लग्नाला नारायण होकार देईना. शेवटी आईने अंतरपाट धरेपर्यंत तरी बोहल्यावर उभा राहा असे साकडे घातले. नारायणाने त्याला मान्यता दिली. आता लग्न होवून नारायण संसारी बनेल अशी स्वप्ने राणूबाई पाहू लागली.

ठरल्याप्रमाणे नारायण बोहल्यावर उभा राहिला. मंगलाष्टकांमधील ‘शुभमंगल सावधान!’ हे ध्रुवपद ऐकल्यावर विचक्षण नारायणाने ‘इथे मंगलकार्य सुरु असतानी ‘सावधान’ हा शब्द का?’ असे विचारले. त्यावेळी गुरुजींनी मंगलाष्टके झाल्यावर लग्न लागून पुरुष गृहस्थाश्रमात प्रवेश करतो. त्यातून त्याला ब्रह्मचर्याश्रमात परत येता येत नाही. यासाठी सावधान असा शब्द आहे असे सांगितले. ते कताच तात्काळ सावध होऊन नारायणाने लग्नमंडपातून पळ काढला (सन १६२०) आणि गोदावरी नदी पार करून २२ दिवसांनी पंचवटी येथील राम मंदिरात पोचला. यावेळी त्यांचे वय होते फक्त १२ वर्षे. कोणी आपल्याला ओळखू नये यासाठी त्यांनी ‘रामदास’ हे नाव धारण केले.

पुढची १२ वर्षे या मुलाने पंचवटी जवळच्या टाकळी या गावात इ.स. १६३२ पर्यंत राहून घोर तपश्चर्ये बरोबर, अनेक धर्मग्रंथांचा अभ्यासही केला. ते सूर्योदयापासून माध्यान्हापर्यंत गायत्री मंत्राचे पुरश्चरण याबरोबर ४ तास मश्रीराम जयराम जयजय रामफ या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करत. वाल्मीकि रामायण या ग्रंथाचे लेखन इथे झाले. या काळात त्यांची शहाजीराजांशी भेट पण झाली. आता आपण त्यांना रामदास स्वामी म्हणूया.

रामनामाचा १३ कोटी संकल्पित जप पूर्ण झाल्यावर, वयाच्या २४ व्या वर्षापासून पुढची १२ वर्षे (१६३२ ते १६४४) रामदास स्वामींनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने हिमालयापासून क्न्याकुमारीपर्यंत भ्रमण करताना, अनेक लायक मंडळींना अनुग्रह देऊन भक्तीमार्गास लावले. हे करत असताना त्यांचे समाज निरीक्षणही चालू होते. त्यात त्यांना असे आढळले की सांप्रतकाळात यवनांच्या आक्रमण, अत्याचार आणि सत्तेमुळे आपला समाज स्वाभिमानशून्य आणि बलहीन होऊन त्याचे अध:पतनही झाले आहे.

श्रीनगरमध्ये शीखांचे सहावे गुरू हरगोविंद यांची व समर्थांची योगायोगाने भेट झाली. ते शस्त्रे आणि सैन्यही बाळगत. समाजाच्या दुर्धर स्थितीसंबंधी दोघांची चर्चा चालू असताना समर्थांनी त्यांना आपण धर्मगुरू आहात. मग तलवार आणि सैन्य का बाळगता? असे विचारले. तेव्हा हरगोविंद म्हणाले, ङ्गसध्या यवन अनन्वित अत्याचार करीत आहेत, त्यांचा सामना करण्यासाठी आपण बलसंपन्न आणि शस्त्रसज्ज होवून प्रतिकार केला, तरच आपला

आणि आपल्या धर्माचा निभाव लागेल. तो खुलासा पटून समर्थही गुप्ती नावाचे शस्त्र बाळगू लागले. तपश्चर्येसाठी लागणाऱ्या कुबडीच्या आत छोटी तलवार असे. समर्थांची ही कुबडी आजही सज्जनगडावर पहायला मिळते. समर्थांना हिमालयात प्रभू रामचंद्रांकडून धर्मसंस्थापनेसाठी प्रेरणा मिळाली होती. त्यापाठोपाठ गुरू हरगोविंद यांनी त्यांना शस्त्रसज्ज होण्याचे प्रेरणा दिली यात संशय नाही.

खोलवर चिंतन करून 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे। परंतु, तेथे अधिष्ठान पाहिजे।' या प्रेरणेने समाजाचे उत्थापन करण्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी बलोपसनेसाठी श्रीमारुतीरायांच्या मूर्तींची स्थापना करून, तेथील लायक तरुण मंडळींना अनुग्रह देऊन, भक्तिमार्गाच्या प्रसारासाठी मठांची निर्मितीही केली. अशा मठामध्ये भक्तीसाधने बरोबर बलोपासनाही होत असे. त्यामुळे हळूहळू तेजोहीन समाजामध्ये बदल होवून सशक्त आणि निर्भय तरुण घडू लागले. भारतभरच्या भ्रमंतीमध्ये त्यांनी असे ११०० मठ स्थापन केले, त्यातले बहुतांशी सुस्थितीमध्ये आहेत.

या मठांचे वैशिष्ट्य असे की भक्ती–शक्ती साधने बरोबर, मठाच्या आसमंतात घडणाऱ्या घटनांवर निरीक्षण ठेवण्यासाठी मठाधिपतीला शिकवले जात होते. त्यामुळे काही वेगळी घटना घडल्यास तिथून लगोलग एखादा रामदासी घोड्यावर स्वार होऊन ८ दिवसाच्या आत समर्थांना त्या घटनेची बित्तंमबातमी देत असे. याची दोन उदाहरणे म्हणजे श्री शिवाजीमहाराजांचा नि:पात करण्यासाठी विजापूरहून अफजलखान निघाला ही खबर समर्थांना तिकडच्या मठपतीकडुन कळली. लगोलग त्यांनी शिवछत्रपतींना एक ओवीबद्ध पत्र पाठवले. वरवर उपदेशपर वाटणाऱ्या या ओव्यांचे पहिले अक्षर घेतले तर विजापूरचा सरदार निघाला असा संदेश प्राप्त होतो. महाराज तत्काळ सावध होवून त्याच्याशी सामना करण्याच्या तयारीस लागले. हे पत्र आजही उपलब्ध आहे. तसेच आग्र्याहून सुटून महाराष्ट्रात परत येत असताना, अशा अनेक मठांमधून त्यांना मदत मिळाली. यावरून समर्थांची दूरदृष्टी किती होती हे आपल्या लक्षात येईल.

१२ वर्षांची तीर्थयात्रेची भ्रमंती पूर्ण झाल्यावर समर्थ १६४५ मध्ये महाराष्ट्रात परत येवून जांब येथे आपल्या मातोश्रींना भेटले. पुढे त्यांनी कृष्णाकाठचा भाग निवडून आपल्या लोकोद्धाराच्या कार्याला सुरुवात केली. या भागात समर्थांनी ११ ठिकाणी मारुतीरायाची स्थापना करून, बल आणि उपासनामार्ग सुरू करून दिला. पुढे सर्व रामदासी मंडळींना शिक्षण देण्यासाठी एखादे स्थान असावे या हेतूने चाफळ येथे आले असता, तिथल्या गावकऱ्यांनी ओसाड स्मशानाची जागा दिली. त्या ठिकाणी समर्थांनी अंगापूरच्या डोहामध्ये प्राप्त झालेल्या प्रभू रामचंद्रांच्या मूर्तीची स्थापना करून एक मंदिर उभे केले. रामाच्या पुढे दासमारुती व मागे प्रतापमारुती स्थापन केला व शिष्यांना रहाण्यासाठी तिथेच मठ उभारला. १६४८ साली चाफळ येथे रामनवमी उत्सव सुरु झाला. इथे समर्थांचा १६७६ पर्यंत येवून–जावून मुक्काम होता.

मधल्या काळामध्ये समर्थ आणि श्री शिवाजी महाराज यांची भेट होऊन १६४९ मध्ये शिंगणवाडीच्या बागेत त्यांनी श्री शिवाजीमहाराजांबरोबर निळो सोनदेव, व बाळाजी आवजी चिटणीस यांनाही अनुग्रह दिला. भावी काळातही त्यांच्या अनेक वेळा भेटी होवून समर्थांच्या ११०० मठातून मिळालेल्या माहितीच्या आधारे राज्य आणि धर्म स्थापने बाबत दोघांमध्ये खलबतेही होत.

सन १६५० च्या काळामध्ये समर्थांच्या अनेक संतांशी भेटी झाल्या. त्यामध्ये संत तुकाराम महाराज, जयरामस्वामी वडगावकर, रंगनाथस्वामी निगडीकर, आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर, केशवस्वामी भागानगरकर हे प्रमुख होत. हे चार स्वामी आणि समर्थ असे मिळून, त्यांना दासपंचायतन असे म्हणत. हे सर्व संत समर्थांना ज्येष्ठतेचा मान देत.

समर्थांचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी राष्ट्र आणि धर्मस्थापनेतील महिलांचे महत्वाचे स्थान ओळखून आपल्या शिष्यपरंपरेत त्यांना, सर्वार्थाने तयारी करून घेवून समाविष्ट करून घेतले. यापैकी २ – अक्काबाई आणि वेण्णाबाई यांना मठपतीही बनवले.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

१६५४ मध्ये समर्थांनी शिवथरघळ येथे काही काळ राहून त्या भागातला स्वराज्याचा शत्रू चंद्रराव मोरे याच्यावर लक्ष ठेवता ठेवता, दासबोध, आणि त्या बरोबर आत्माराम, मनोबोध इ. ग्रंथ आणि भावी काळात असंख्य अभंग, पदे, आख्याने, भारुडे यांच्या रचना केल्या. योग्य वेळ येताच १६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी चंद्ररावास ठार मारले आणि तो भाग स्वराज्यास जोडला. १६५९ मध्ये समर्थ पंढरपूरला गेले असता पांडुरंगाने त्यांना श्रीरामरुपात दर्शन दिले.

१६७३ मध्ये साताऱ्या जवळील परळीचा किल्ला आदिलशहाकडून जिंकून घेतल्यावर, शिवछत्रपतींनी समर्थांना उघड्यावर न राहता, या गडावर राहून पुढील कार्य करण्यासाठी विनंती करुन, मठही बांधून दिला. किल्ल्याचे नाव सज्जनगड असे ठेवले. सन १६७६ मध्ये समर्थ सज्जनगडावर रहायला आले.

१६५५ साली मातोश्री राणूबाई यांचे निधन झाल्यावर, समर्थ रामेश्वर येथे जात असताना मिरज येथे जयरामस्वामींना त्रास देणाऱ्या दिलेरखानाला त्यांनी वठणीवर आणले. तो समर्थांना शरण गेला आणि मिरज येथील मठाकरता त्याने जागा दिली. समर्थांनी तिथे मठस्थापना करून वेण्णाबाईंना मठपती केले. पुढे १६५५ मध्ये तंजावर येथे शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू व्यंकोजीराजांना अनुग्रह देऊन, तेथेही मठस्थापना करून भीम स्वामींना मठपती केले. १६५६ मध्ये त्यांची आणि वामन पंडित यांची भेट झाली. १६६५ साली चिंचवड येथे मोरया गोसावी यांची भेट झाली.

सन १६७४ मध्ये शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाल्यावर, आपण योजलेले आनंदभूवनाचे स्वप्न साकार झाल्याचा समर्थांना अतिशय आनंद झाला.

समर्थांच्या हयातीत त्यांना अनेक उत्तमोत्तम शिष्य लाभले, त्यात मुख्यतः टाकळीचे उद्धवस्वामी, महाबळेश्वरचे दिवाकर आणि अनंत भट, वाई येथे पिटके, थिटे, चित्राव, कराड मिरज कोल्हापूर या भागामध्ये अक्काबाई, कल्याणस्वामी आणि दत्तात्रेय वगैरे होत ज्यांनी त्यांच्या पश्चातही सर्वत्र बलोपासना आणि भक्तिमार्गाचा प्रसार केला.

सन १६७९, पौष शुक्ल नवमी ते माघ शुक्ल पौर्णिमेपर्यंत शिवाजी महाराज सज्जनगडावर होते. इ.स. १६८० चैत्र पौर्णिमेला रायगडावर शिवाजी महाराज परंधामास गेले. या आघाताने समर्थांच्या तब्येतीवर मोठा परिणाम होऊ लागला. त्यांना अन्न घ्यावेसे वाटेना. व्यथित संभाजीराजे दर्शनास येऊन गेले. रायगडावर काही अनुचित घटना घडल्या. उग्र स्वभाव जावा यासाठी समर्थांनी राजांना उपदेशपर करून नंतर तसे पत्रही लिहिले.

सन १६८१ मध्ये समर्थ चाफळ येथे रामनवमी उत्सवास गेले. मार्गशीर्षात कल्याणस्वामी डोमगांवहून समर्थ दर्शनास येऊन गेले. माघ वद्य पंचमी इ.स. १६८२ या दिवशी चंदावरहून व्यंकोजीराजांनी पाठविलेल्या श्रीरामपंचायतन मूर्ती सज्जनगडावर आल्या. समर्थांनी त्यांची स्वहस्ते पूजा आणि स्थापना केली.

यानंतर समर्थांनी शेवटची निरवानिरव करण्यास सुरुवात केली आणि काही दिवसातच माघ कृष्ण ९, शके १६०३ (२२ जानेवारी १६८२) शनिवार दुपारी सज्जनगडावर रामनामाचा घोष करून समर्थ श्रीरामरुपात विलीन झाले. ज्याठिकाणी श्रीसमर्थांना अग्निसंस्कार केला त्या ठिकाणी संभाजी महाराजांनी राममंदिर व तळघरात समाधीमंदिर बांधले.

समर्थांच्या पश्चात अक्कास्वामी आणि दिवाकर गोसावी यांनी सज्जनगड व चाफळ मठाचा कारभार ३८ वर्षे सांभाळला. समर्थांनी आपल्या संप्रदायाची बांधणी इतकी व्यवस्थित केली होती, की आज ३५० वर्षे लोटूनही त्यांनी स्थापन केलेले मारुती, मंदिरे, मठ आणि लीलास्थाने याठिकाणी त्यांचे भक्ती आणि समाजोपयोगी कार्य आजही व्यवस्थित चालू आहे, हे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अशा राष्ट्रसंताला त्रिवार प्रणाम!

**अविनाश ब. हळबे**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# बाबासाहेब आंबेडकर आणि दत्तोपंत ठेंगडीजी

बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या अनुसूचित जाती महासंघाशी संबंधित काही दलित नेत्यांच्या गटाने त्यांना विचारले की, दत्तोपंत ठेंगडी या ब्राह्मणाची महासंघाच्या सरचिटणीसपदी नेमणूक का केली? हे ऐकून बाबा साहेब म्हणाले, ज्या दिवशी तुमच्यापैकी कोणी ठेंगडीपेक्षा मोठा दलित बनेल, त्या दिवशी मी तुम्हाला महासंघाचा सरचिटणीस बनवीन. विशेषतः १९५२ ते १९५६ या काळात दत्तोपंत ठेंगडी यांच्याशी जवळून काम करणाऱ्या दत्तोपंत ठेंगडी यांच्यावरील त्यांचा विश्वास या शब्दांतून दिसून येतो. हा किस्सा ठेंगडीजींनी स्वत: भुवनेश्वर विमानतळावर बीएमएसचे माजी संघटन सचिव कृष्णचंद्र मिश्रा यांच्याशी शेअर केला होता. ठेंगडीजी श्री हरिदास बाबू आवळे, श्री राजाभाऊ यांच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या संपर्कात आले. खोब्रागडे, आर. एस. गवई आणि हरबा गोंडाणे. दत्तोपंत ठेंगडी, भारतातील सर्वात मोठ्या कामगार संघटनेचे संस्थापक, भारतीय मजदूर संघाचे बाबासाहेबांशी घनिष्ठ संबंध होते. डॉ. आंबेडकरांना जवळून पाहणाऱ्या, सखोल समजून घेणाऱ्या आणि गंभीर असणाऱ्या दत्तोपंतानी त्यांच्याशी काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रदीर्घ चर्चा केली.

आम्ही भारतीय जनसंघ, अनुसूचित जाती महासंघ आणि सोशलिस्ट पार्टी ची संयुक्त आघाडी स्थापन केली होती मध्य प्रदेशात १९५२ च्या निवडणुकीसाठी. त्या निवडणुकीत विदर्भातील काही शहरांमध्ये मतपेटीत छेडछाड झाल्याचे पुरावे मिळाले होते. त्यानंतर आम्ही निवडणूक आयोग आणि निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आयोगाने आमची तक्रार वैध ठरवली. अनुसूचित जातीचे लोक त्या लढाईत फेडरेशन आणि सोशलिस्ट पार्टीही आमच्यासोबत होती. बाबासाहेबांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली. नागपुरात आल्यावर त्यांनी मला फोन केला. त्या दिवसापासून ते आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत माझा त्यांच्याशी जवळचा संबंध होता. तेव्हा मी खूप लहान होतो. प्रौढ व्यक्तीचे तरुण आणि उत्साही माणसाशी असलेले संबंध आम्ही जपले. ते मला त्यांच्या कुटुंबातील मुलासारखे वागवायचे, असे दत्तोपंतजी लोकहित प्रकाशन, लखनौ यांनी प्रकाशित केलेल्या 'डॉ. आंबेडकर आणि सामाजिक क्रांती की यात्रा' या पुस्तकात लिहितात.

१९५६ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या काही दिवस अगोदर ठेंगडीजींनी बाबासाहेबांशी विशेषत: बौद्ध धर्म का स्वीकारणार आहे, याविषयी प्रदीर्घ आणि सविस्तर चर्चा केली. ठेंगडीजी त्या चर्चेची आठवण अशा प्रकारे करून देतात: त्यांच्या दीक्षाच्या काही दिवस अगोदर मी त्यांना सांगितले होते की, जुन्या काळी काही अत्याचार कायम राहिले असावेत हे बरोबर आहे, जुन्या चुका सुधारून पश्चाताप करून आपण काही तरुण नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत हे तुमच्या माहितीत आहे का?

बाबासाहेब म्हणाले, म्हणजे आरएसएस ? कारण त्यांना माहित होते की, मी आरएसएस (रा. स्व. संघ) प्रचारक आहे. ते पुढे म्हणाले, मी याचा विचार केला नाही असं तुला वाटतं का?

मी म्हणालो, कसं सांगू? तुम्ही याचा विचार केला असेल.

मग बाबासाहेबांनी विचारले, संघाची स्थापना कधी झाली? किती वर्षे उलटून गेली?

मी म्हणालो, संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. आता २७-२८ वर्षे उलटून गेली.

ते म्हणाले, मला माहित आहे. पण एक गोष्ट सांगा तुम्हा लोकांची एकूण ताकद किती आहे?

मी उत्तर दिले - मी या क्षणी सांगू शकत नाही.

ते म्हणाले, पत्रकार परिषदेसारखे उत्तर देऊ नका. नेमकं सांगा.

खरंच माहित नाही. मी पुन्हा म्हणालो.

मग ते म्हणाले, समजा, तुमजी संख्या २७-२८ लाखांच्या आसपास आहे. एवढ्या लोकांना सोबत आणायला तुम्हाला २७-२८ वर्षे लागली. संपूर्ण समाजाला एकत्र आणण्यासाठी तुम्हाला किती वेळ लागेल?

मला काही तरी बोलायचं होतं, पण ते पुढे म्हणाले, काही बोलू नकोस. अंकगणित आणि भौमितिक घडामोडी एकत्र होत नाहीत हे मला माहीत आहे. बेडूक कितीही विस्तारला तरी तो बैल होऊ शकत नाही. त्यासाठी बराच वेळ लागेल. तोपर्यंत परिस्थिती थांबेल का आणि मी गप्प बसू का? मला माझ्या मृत्यूच्या आधी समाजाला दिशा द्यायची आहे. कारण खूप काळपर्यंत हा समाज आतापर्यंत शोषणाला बळी पडला आहे.

लोकांमध्ये जागृती आहे आणि त्यांच्या मनात काही प्रमाणात संताप आणि चिडचिड होणे स्वाभाविक आहे; आणि असा समाज साम्यवादाचं सहज खाद्य बनतो. हा समाज साम्यवादासाठी कच्च्या दारूगोळ्यासारखा आहे. मला असे वाटत नाही की अनुसूचित जातीचा समाज साम्यवादाचं सावज बनावा. म्हणून, त्यांना दिशा देणे राष्ट्रीय हिताचे आहे. तुम्ही संघाचे लोक राष्ट्रीय दृष्टिकोनाने काम करत आहात, परंतु लक्षात ठेवा की अनुसूचित जाती आणि साम्यवाद यांच्यामध्ये आंबेडकर अडथळा आहेत आणि सामान्य (अनूसूचित जाती सोडूनचे) हिंदू आणि साम्यवाद यांच्यामध्ये गोळवलकर (कारण ते ब्राह्मण आहेत) अडथळा आहेत. हे बरोबर नाही का? त्यांनी विचारले. ते पुढे म्हणाले, म्हणूनच जर मी त्यांना दिशा देण्यात अयशस्वी झालो, तर समाजाचा एक मोठा वर्ग साम्यवादाकडे आकर्षित होईल. मग त्यांना राष्ट्रीय मुख्य प्रवाहात परत आणणे तुमच्यासाठी सोपे होणार नाही; कारण प्रश्न असा नाही की तुम्ही जे सांगत आहात ते बरोबर आहे की नाही. तुम्ही सर्व उच्चवर्णीय लोक आहात, आमचा समाज तुमचे ऐकणार नाही. म्हणूनच मी माझ्या मरण्यापूर्वी ही व्यवस्था केली आहे. ('डॉ. आंबेडकर और सामाजिक क्रांती की यात्रा', लोकहित प्रकाशन, लखनौ, पृष्ठ १५५– १५६). ठेंगडीजी येथे एक महत्त्वाची वस्तुस्थिती अधोरेखित करतात.

ठेंगडीजी म्हणतात, की बाबासाहेबांनी १९३५ मध्ये धर्मांतर करण्याचा निर्णय जाहीर केला होता, परंतु त्यांनी १९५६ मध्ये त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस त्याला प्रत्यक्षात आणलं. या २०–२१ वर्षात त्यांनी अस्पृश्य लोकांना न्याय मिळावा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांना सक्तीने आपली उपासना पद्धत बदलण्याचा निर्णय घ्यावा लागला. या लढ्यात १९३५ हे त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे वळण ठरले. २७ मे १९३७ रोजी त्यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई यांच्या निधनानंतर ते अध्यात्माकडे वळले आणि राजकारणापासून दूरही गेले. बाबासाहेबांना रा. स्व. संघाबद्दल पूर्ण माहिती होती. त्यांनी १९३५ मध्ये पुणे येथील महाराष्ट्र प्रांतातील पहिल्या संघ शिक्षण वर्गाला भेट दिली होती. त्यानंतर ते डॉ. हेडगेवारांनाही भेटले. बाबासाहेब वैयक्तिक भेटीसाठी दापोली येथे होते. त्यानंतर त्यांनी स्थानिक संघ शाखेला भेट दिली आणि स्वयंसेवकांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. १९३९ मध्येही बाबासाहेबांनी पुण्यातील संघ शिक्षा वर्गाला भेट दिली होती आणि डॉ. हेडगेवार यांच्यासह स्वयंसेवकांशी संवाद साधला होता. महात्मा गांधींच्या हत्येनंतर आर.एस.एस. वर बेकायदेशीरपणे लादलेली बंदी उठवण्यातही बाबासाहेबांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. श्री गुरुजींनी सप्टेंबर १९४९ मध्ये त्यांना पाठिंबा दिल्याबद्दल औपचारिक आभार मानण्यासाठी भेट घेतली. नंतर १९५३ मध्ये, श्री मोरोपंत पिंगळे, श्री बाळासाहेब साठे आणि प्रा. ठाकर यांनी औरंगाबाद येथे बाबासाहेबांची भेट घेतली. त्या भेटीदरम्यान बाबासाहेबांनी मोरोपंतजींना सांगितले, मी तुमच्या संघ शिक्षा वर्गाला भेट दिली आहे. तुमच्याकडे असलेली ताकद इतक्या वर्षात अपेक्षित वेगाने वाढत नाही. वेग मंद आहे. माझा समाज जास्त काळ वाट पाहू शकणार नाही. ('डॉ. आंबेडकर और सामाजिक क्रांती की यात्रा', पृष्ठ १५३–१५४).

अस्पृश्यता निवारणासाठी बाबासाहेबांच्या प्रयत्नांबद्दल ठेंगडीजी म्हणाले की, अस्पृश्यता निवारण हे मुळात हिंदू समाजाला एकत्र करून ते मजबूत करण्याचे काम आहे. तथाकथित अस्पृश्य हे हिंदू समाजाचा अविभाज्य भाग आहेत. म्हणून, अस्पृश्यता निर्मूलन हे राष्ट्रीय कारण आहे. बाबासाहेबांनी उच्चवर्गीय हिंदू आणि तथाकथित अस्पृश्य, दोघांनाही या संदर्भात मुस्लिम मानसिकतेपासून सावध राहण्याचे आवाहन केले होते. अनेकांनी बाबासाहेबांचे जीवनचरित्र लिहिले आहे आणि त्यांनी त्यांच्या आयुष्यात झालेल्या अपमानाचा उल्लेख केला आहे. अनूसूचित समाजातील सामान्य लोकांना पिढ्यानपिढ्या असे कटू अनुभव येत आहेत. पण बाबासाहेबांना महान बनवणारी गोष्ट म्हणजे अपमान सहन करताना ते गप्प बसले नाहीत, तर त्यांनी परिस्थिती बदलण्यासाठी काम करण्यास सुरुवात केली. त्यांचा ठाम विश्वास होता की, अस्पृश्यतेची समस्या संपूर्ण हिंदू समाजाने एकत्रितपणे सोडवली पाहिजे. कारण हा प्रश्न कोणत्याही विशिष्ट वर्गाचा नाही; तर संपूर्ण समाजाचा आहे. म्हणूनच जेव्हा त्यांनी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभा सुरू केली तेव्हा त्यांनी उच्च वर्गातील काही लोकांनाही संघात सामावून घेतले. १९४६ च्या निवडणुकीत अनुसूचित जाती महासंघाचा अपमानजनक पराभव झाला. बाबासाहेबांच्या संघर्षाला हा एक

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

मोठा धक्का होता. पण निराशेने घरी बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. त्यांनी त्यांच्या अनुयायांना अशा संदेशाद्वारे प्रेरित केले: मी या पराभूत मानसिकतेचा स्वीकार करत नाही. निवडणुकीत जागा जिंकणे हा अनूसूचित महासंघाचा आदर्श नाही. महासंघासाठी जागा जिंकणे हे केवळ ध्येय गाठण्याचे एक साधन आहे. खरे ध्येय म्हणजे ज्या लोकांसाठी अनूसूचित महासंघ स्थापित केला आहे त्या लोकांची सेवा करणे.

निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही, बाबासाहेब मूल्यांवर आधारित राजकारण करणारे होते. ठेंगडीजींना १९५४ मध्ये भंडारा (महाराष्ट्र) येथे झालेल्या पोटनिवडणुकीची एक घटना आठवते. बाबासाहेब आणि मुंबईमध्ये लढलेले अशोक मेहता दोघेही पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात होते. भंडारा येथे अस्पृश्य मतदारांची संख्या मोठी होती, परंतु केवळ अस्पृश्यांकडून मिळालेल्या मतांच्या जोरावर निवडणूक जिंकणे अनिश्चित होते. सर्वांना माहित होते की अस्पृश्य मतदार अशोक मेहतांना मतदान करतील, परंतु बाबासाहेबांना अशोक मेहतांच्या पक्षाकडून कोणतेही मत मिळणार नाही. त्या परिस्थितीत, अशोक मेहतांच्या बाजूने दुसरे मत देण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. जर असे झाले तर भंडारा येथे बाबासाहेबांचा पराभव निश्चित होता. या सर्व समीकरणांना लक्षात घेऊन अनुसूचित जाती महासंघाची बैठक झाली. कार्यकर्त्यांनी दुसरे मतदान न करण्याचा निर्णय घेतला. बैठक सुरूच होती. बाबासाहेब अचानक खोलीत आले. त्यांनी विचारले की काय चर्चा होत आहे? त्यांना सांगण्यात आले की, त्यांनी दुसरे मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे, कारण जर ते झाले तर तुम्ही (बाबासाहेब) जिंकणार नाही. हे ऐकून बाबासाहेब संतापले आणि म्हणाले, मी पराभवाला सामोरे जाण्यास तयार आहे, पण मी तुम्हाला तुमचे दुसरे मतदान न करण्याची परवानगी देणार नाही. मी भारताचे संविधान तयार केले आहे. राजकीय व्यवस्थेतील असे बेजबाबदार पाऊल मी स्वीकारू शकत नाही. ('डॉ. आंबेडकर और सामाजिक क्रांती की यात्रा', पृष्ठ १७०). १९५४ मध्ये बाबासाहेबांनी जे म्हटले होते, ते आज नोटाच्या नावाखाली आपल्या देशात निर्माण झालेल्या आजारावर प्रश्न उपस्थित करते. जर बाबासाहेब दुसरे मतदान मतदानाशिवाय सोडण्यास तयार नसतील, तर त्यावर काय उपाय असावा? या प्रश्नाने सभेला उपस्थित असलेल्या सर्व लोकांच्या मनात घोळत होता. काही लोकांनी असे सुचवले की त्यांनी उच्चवर्णीय उमेदवार उभा करावा आणि दुसरे मत त्याच्या बाजूने द्यावे. ठेंगडीजी आठवण सांगतात, मीही त्या बैठकीला उपस्थित असल्याने काही लोकांनी माझे नाव सुचवले. बाबासाहेबांनी मला निवडणूक लढवण्यास सांगितले. संघ प्रचारक असल्याने मला निवडणूक लढवणे शक्य नव्हते. मी म्हणालो, माझ्याकडे निधी आणि इतर साधने नाहीत.

बाबासाहेब म्हणाले: आम्ही सर्व काही व्यवस्था करू.

मी म्हणालो, मला संघ अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागेल. मी या संपूर्ण विषयावर श्री गुरुजींशी चर्चा केली, ते म्हणाले, ही एक चांगली संधी आहे, पण तुम्ही निवडणूक लढवली तर आपल्याला अपेक्षित परिणाम मिळणार नाही. कारण आपले सर्व (रा. स्व. संघ) कार्यकर्ते बाबासाहेबांसाठी पूर्ण समर्पणाने काम करतील, तरीही लोक म्हणतील की ठेंगडी निवडणूक लढवत असल्याने संघाचे लोक बाबासाहेबांसाठी काम करत आहेत. म्हणून, तुम्ही निवडणूक लढवू नका आणि आपल्यापैकी कोणालाही निवडणूक लढवणार नाही याची खात्री करा. उलट, तुम्ही भंडाऱ्याच्या सर्व संघ कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन पूर्ण समर्पणाने बाबासाहेबांसाठी काम करा. संघाचे लोक बाबासाहेबांसाठी काम करत आहेत हे बाबासाहेबांना आणि अस्पृश्यांना लक्षात आले पाहिजे. यामुळे देशातील सामाजिक सौहार्द मजबूत होण्यास मदत होईल. ('डॉ. आंबेडकर और सामाजिक क्रांती की यात्रा', पृष्ठ १७०-१७१)

ठेंगडीजी सांगतात की भंडाऱ्याच्या सर्व रा. स्व. संघ कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या बाजूने प्रचार केला. बाबासाहेब पराभूत झाले असले तरी, मिळालेल्या मतांचे विश्लेषण करताना त्यांना मतदारसंघातील अस्पृश्यांच्या एकूण मतांपेक्षा खूप जास्त मते मिळाली हे आढळले. यामुळे त्यांना खूप समाधान झाले. बाबासाहेबांनी त्यांच्या दीक्षेच्या दुसऱ्या दिवशी नागपूरच्या श्याम हॉटेलमध्ये काही अनुसूचित जाती महासंघाच्या नेत्यांची भेट घेतली, तेव्हा त्यांनी ही भावना व्यक्त केली. बाबासाहेब म्हणाले, तुम्हाला राजकारणात रस आहे, पण मला धर्मात जास्त रस आहे. भंडाऱ्याची निवडणूक मी अपेक्षेप्रमाणे हरलो याचं मला दुःख नाही. पण मला समाधान देणारी गोष्ट म्हणजे अस्पृश्य

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

आणि उच्चवर्गीयांमध्ये दिसणारी विभागणी नाहीशी झाली. अस्पृश्यांव्यतिरिक्त, मला उच्चवर्गीय मतदारांची मतेही मिळाली. आता आपल्याला आपले विचार बदलण्याची गरज आहे. केवळ अस्पृश्य आणि मागासवर्गीयांना एकत्रित करण्याऐवजी, आपण संपूर्ण समाजाला एकत्रित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ठेंगडीजी म्हणाले की, श्रीगुरुजींच्या मार्गदर्शनामुळे आपण (संघ) ते करू शकलो.

दुर्दैवाने, बाबासाहेबांना नवीन सामाजिक एकत्रीकरण सुरू करण्याची संधी मिळाली नाही, कारण त्यांचे १९५६ मध्येच निधन झाले. जर ते शक्य झाले असते, तर भारतीय राजकारणाचा चेहरामोहरा बदलला असता. काँग्रेसच्या तीव्र विरोधानंतरही ते शेवटपर्यंत सामाजिक समरसतेबद्दल चिंतेत होते. मुंबई कापड गिरणी कामगारांच्या संपानंतर बाबासाहेब कामगार संघटना चळवळीच्या जवळ आले. ज्या संघटनेने संप पुकारला होता त्याचे नेतृत्व कम्युनिस्टांनी केले होते. हा संप सर्व कामगारांच्या मागण्यांसाठी होता, परंतु अस्पृश्य कामगारांशी संबंधित काही विशिष्ट मागण्यांचा त्यांच्या अजेंड्यात उल्लेख नव्हता.

बाबासाहेबांचा नेहमीच असं आकलन होतं की, कम्युनिस्ट त्यांच्या राजकीय हितासाठी कामगार आणि कामगार संघटनांचा वापर करतात. मुंबई कापड गिरण्यांच्या संपादरम्यानही त्यांचे असेच मत होते. २९ एप्रिल १९२९ रोजी मुंबईच्या दामोदर सभागृहात कामगारांच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवताना त्यांनी सांगितले की, संपाची हाक चांगली नाही. त्या काळात त्यांनी अनुभवलेल्या कामगारांच्या समस्यांमुळे १९४२ ते ४६ पर्यंत ते व्हाईसरॉय कौन्सिलमध्ये कामगार मंत्री असताना कामगारांच्या अनेक समस्या सोडवण्यास मदत झाली. त्या काळात त्यांनी कामगारांच्या हितासाठी सुमारे २५ कायदे केले. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरांसारख्या दूरदर्शी व्यक्तींशी असलेल्या त्यांच्या सहवासामुळेच ठेंगडीजींनी त्यांच्या आयुष्यात अनेक चमत्कार केले. गोष्टी आणि घडामोडींकडे पाहण्याची त्यांची दृष्टी सामान्य लोकांपेक्षा वेगळी होती. म्हणूनच त्यांनी चौकटीबाहेर विचार केला आणि अनेक संघटनांचा पाया घातला ज्यांनी नंतर आपापल्या क्षेत्रात वर्चस्व गाजवले.

**प्रमोद कुमार**

◈ ◈ ◈



## बार्शी येथे हिंदू महिला संमेलन

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी, मातृ शक्ती बार्शी यांच्या कडून हिंदू नव वर्ष, गुडी पाडव्या निमित्त महिलांची भव्य मोटार सायकल रॅली आणी महिलांच्या हिंदू संमेलनाचे आयोजन गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी करण्यात आले

सदर मोटार सायकल रॅलीची सुरूवात बार्शीच्या नगराध्यक्षा सौ. तेजस्वीनी कथले, अश्विनी चव्हाण सामजीक कार्यकर्त्या सोलापूर, सौ गौरीताई रसाळ यांच्या हस्ते भगवा ध्वज दाखवून झाली

सदर मोटार सायकल रॅली मध्ये शेकडो भगीनींनी सहभाग नोंदवला, सहभागी भगीनींना भगवे फेटे श्रीराम नवमी मध्वर्ती उत्सव समीती कडून बांधण्यात आले तसेच कलाधीश ढोल ताशा पथकाने मंगल वादन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

सदर रॅली श्रीराम मंदिर भगवंत मंदिर मार्ग येथून निघून, महाद्वार चौक, वीर सावरकर चौक, पटेल चौक, तुळशीराम रोड, रोडगा रस्ता, आडवा रस्ता, आर.एस.एम हाईट, बस स्टॅन्ड चौक, पोस्ट चौक, जूने पोलीस स्टेशन सोमवार पेठ, नगर परिषद, नरवीर तानाजी चौक संकेश्वर उद्यान एकवीराई चौक, भगवंत मंदिर मार्गे शिव सृष्टी येथे समारोप झाला.

त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या सिंहासनारूढ मुर्तीस पुष्पहार अर्पण करून तसेच राम दरबार आणी भारत मातेच्या प्रतीमेचे पुजन करून हिंदू संमेलनाचे उद्घाटण करण्यात आले. हिंदू संमेलनाच्या कार्यक्रमाचे प्रास्थावीक सौ सुनीती घारे यांनी केले तसेच सौ हर्षदा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले अश्विनी चव्हाण यांची समाजातील पंच परिवर्तन या विषयावर व्याख्यान दिले. सदर कार्यक्रमास शेकडो महिला भगीनींनी सहभाग नोंदवला

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी, मातृ शक्तीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

## मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : भाग ४

# राष्ट्रीय म्हणजे काय?

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नावातला राष्ट्रीय हा पहिला शब्द आहे, म्हणूनच तो सर्वात महत्त्वाचा आहे. संघटन करायचे, संस्कार करायचे, स्वार्थ न ठेवता काम करायचे. पण कशाकरिता? उत्तर आहे – राष्ट्राकरिता. पण राष्ट्र म्हणजे काय? जमिनीचा एक तुकडा म्हणजे राष्ट्र होऊ शकत नाही, कोणत्यातरी भौगोलिक सीमांमध्ये राहणाऱ्या लोकांचे राष्ट्र होऊ शकत नाही तर राष्ट्र होण्यासाठी तीन अटी आहेत.

पहिली ही की, लोक ज्या देशात किंवा भूभागात राहतात, त्याच्याविषयी त्यांना काय वाटते? ते त्या देशाला आपली मातृभूमी मानतात की भोगभूमी मानतात. माणसाच्या जीवनात आईचे स्थान किती थोर असते, किती पवित्र असते. एखाद्या वस्तूला आपण माता मानले की तिचे आणि आपले भावबंधनच वेगळे होतात. मातेचे पावित्र्य आणि महिमा जाणणे ही मानवाचीच विशेषता आहे, जनावरांना माता हे नाते समजतच नाही. देश किंवा भूमी तशी निर्जीव असते, दगडा – धोंड्यांची असते. परंतु तिला माता म्हटले की ती सजीव बनते, वंदनीय बनते, ती मातृभूमी होते. कवी बंकिमचंद्रांनी आपल्या वंदे मातरम या राष्ट्रीय गीतामध्ये भारत मातेचे वर्णन केले आहे. ज्यांना आपल्या मातृभूमीला वंदन करायला आनंद व अभिमान वाटतो त्या लोकांचे राष्ट्र बनते.

आता दुसरी अट पाहूयात. लोक एखाद्या प्रदेशात कितीतरी वर्षांपासून रहात असतात, त्यांचा एक इतिहास बनतो. या इतिहासात अनेक घटना घडलेल्या असतात. काही आनंद देणाऱ्या असतात, काही दुःख देणाऱ्या असतात. या घटना वाचताना, ऐकताना किंवा चित्रातून पाहताना ज्यांच्या मनात समान प्रकारच्या भावना उदय पावतात, मग त्या आनंदाच्या असो नाही तर दुःखाच्या, त्यांचे राष्ट्र बनत असते. शिवाजी महाराजांचा जय झाला की आपल्याला आनंद होतो. राणा प्रतापांचा पराभव होतो, त्यांना रानावनात हिंडावे लागते याचे आपल्याला दुःख होते. का? आपल्याला तर जंगलात हिंडावे लागले नाही तरीही आपण दुःखी होतो. गुरुगोविंदसिंहांच्या मुलांना भिंतीत चिणून मारले जाते, ती कथा ऐकताना आपल्या डोळ्यात पाणी येते. का? त्या मुलांशी आपला कोणता संबंध होता? तरीही आपल्या डोळ्यात पाणी येतेच. झाशीची राणी रणांगणात पराभूत होते, आपण दुःखी होतो. आपल्या क्रांतिकारकांनी इंग्रज अधिकाऱ्यांचे हत्या केली हे वाचताना आपण आनंदी होतो. इतिहासातील या किंवा अशाच घटना ऐकून – वाचून – जाणून ज्यांच्या मनात समान भावना निर्माण होतात त्यांचे राष्ट्र बनते. याचाच अर्थ ज्यांचा इतिहास समान असतो त्यांचे राष्ट्र बनते.

राष्ट्र होण्यासाठीची तिसरी अट सर्वात महत्त्वाची आहे. ज्यांचे चांगले आणि वाईट ठरविण्याचे मापदंड समान असतात, त्यांचे राष्ट्र बनते, या मापदंडांनाच संस्कृती म्हणतात. रावण वाईट, राम चांगला. कंस वाईट, कृष्ण चांगला. कौरव वाईट, पांडव चांगले. हे सर्वांना समजते, त्यामुळे कोणीही आपल्या मुलाचे नाव रावण किंवा कंस ठेवीत नाही.

दुसऱ्याच्या स्त्रीला पळविणे हे वाईट, स्वार्थासाठी आपल्या पित्याला तुरुंगात टाकणे हे वाईट, कबूल केलेले राज्य न देणे, प्रत्यक्ष भावजयीला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करणे हे वाईट तर सावत्र आईच्या म्हणण्यास्तव राज्याभिषेक समारंभ सोडून आनंदाने वनात जाणे पत्करणारा राम चांगला, दुष्टांचा सहार करणारा कृष्ण आपला आदर्श, लोकांचे दुःख पाहून कळवळून

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

राजवाडा सोडून सुखाच्या शोधार्थ निघणारे गौतम बुद्ध आपल्याला वंदनीय, शत्रूच्या स्त्रीला पकडून आणून दिली असताना तिचा सन्मान करून तिला सासरी पाठवणारे छत्रपती शिवाजी महाराज आपले आदर्श. हे आदर्श का? तर त्यांनी आपली संस्कृती प्रत्यक्ष आचरणात आणली म्हणून. ज्यांची संस्कृती एक असते, जे जाती-पातीचा पंथ-संप्रदायाचा विचार न करता चांगल्याला चांगले आणि वाईटास वाईट म्हणतात, त्यांचे राष्ट्र बनते. ज्यांना आपला देश मातृभूमी वाटतो, ज्यांना आपला इतिहास आपला वाटतो आणि ज्यांना आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटतो त्यांचे राष्ट्र बनते. या भारतात असे कोणते लोक आहेत, की ज्यांना वंदे मातरम म्हणताना अभिमान वाटतो, इतिहास आपला वाटतो, संस्कृती आपली वाटते; अर्थातच हे लोक आहेत हिंदू, म्हणूनच हिंदू या शब्दाचाच दुसरा अर्थ राष्ट्रीय असा आहे, म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नावामध्ये पहिला शब्द राष्ट्रीय आहे व या राष्ट्रीय शब्दाचा अर्थ हिंदू असा आहे.

**– डॉ. सचिन वसंतराव लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख, रा.स्व.संघ**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# अक्षय्य तृतीया - सण अक्षय समृद्धीचा!

**वैशाखस्य शुक्लपक्षे तृतीया या शुभप्रदा ।**
**अक्षया सा स्मृता लोके सर्वसौख्यप्रदायिनी ।।**

म्हणजेच याचा अर्थ असा की, मराठी दिनदर्शिका नुसार वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीया ही अत्यंत शुभ मानली जाते. ती लोकांना सुख आणि समृद्धी देणारी आहे. आणि विशेष म्हणजे या दिवशी केलेले कार्य, दान हे आपणास समृद्ध बनवते.

सनातन परंपरेत, जीवन तत्वज्ञान देणाऱ्या काही विशिष्ट तिथी आहेत. अशीच एक पवित्र तारीख म्हणजे अक्षय तृतीया! ज्याला अखा तीज किंवा अक्षय तीज असेही म्हणतात. या सणात अक्षय असा उल्लेख येतो, या शब्दाचा अर्थ असा आहे की जो कधीही क्षय पावत नाही, म्हणजेच जो कायमचा टिकतो, जो अनंत आहे. म्हणूनच या दिवशी केलेले जप, तप, दान, सेवा, हवन किंवा कोणतेही शुभ कार्य शाश्वत फळ देणारे मानले जाते. हा सण आध्यात्मिक प्रगती, धार्मिकता, सेवा आणि सत्कर्मांच्या कधीही न संपणाऱ्या परंपरेचे स्मरण करतो. तसेच ह्या दिवशी अजून एक विशेष केले जाणारे कार्य म्हणजे आपल्या पितरांचे स्मरण करून पूजन व नैवेद्य दाखवून थंडगार पाण्याने भरलेला उदककुंभ दान करावा असे मानले जाते.

याच दिवसाचे महत्त्व अजून स्पष्ट करून जाणून घेऊयात:

अक्षय तृतीया या दिवसाला खालील काही घटनांमुळे धार्मिक व पौराणिक महत्व प्राप्त झाले आहे.

१) युगादी तिथी: हिंदू काळाच्या गणनेनुसार, अक्षय तृतीया ही सत्ययुगाची समाप्ती आणि त्रेतायुगाची सुरुवात होती.

२) परशुराम जयंती: भगवान विष्णूंचे सहावे अवतार आणि शस्त्रे आणि शास्त्रांचे स्वामी भगवान परशुराम या दिवशी प्रकट झाले.

३) गंगेचे अवतरण: भगीरथाच्या तीव्र तपश्चर्येने प्रसन्न होऊन, आई गंगा या दिवशी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली, ज्यामुळे सर्व प्राण्यांचे उद्धार शक्य झाले.

४) अक्षय पात्राची प्राप्ती: महाभारत काळात पांडवांच्या वनवासादरम्यान, सूर्यदेवाने त्यांना अक्षय पात्र दिले, ज्यामुळे त्यांना कधीही अन्नाची कमतरता भासू नये.

५) सुदामा आणि कृष्णाची भेट: द्वारकाधीश श्रीकृष्णाने या तारखेला त्यांचा सर्वात जवळचा मित्र सुदामाची गरिबी दूर केली.

अक्षय तृतीयेला अबुज मुहूर्त असे ही म्हटले जाते. याचे कारण असे की, या दिवशी कोणत्याही शुभ कार्यासाठी विशिष्ट शुभ मुहूर्त शोधण्याची आवश्यकता भासत नाही. लग्न, घराचे भूमिपूजन, नवीन व्यवसाय सुरू करणे, वाहन खरेदी करणे तसेच सोन्या चांदीचे दागिने खरेदी करणे यासारखी सर्व शुभ कामे या दिवशी निर्विघ्न पूर्ण होतात असे मानले जाते.

अक्षय तृतीयेचा सण हा भगवान विष्णूच्या लक्ष्मी नारायण रूपाला समर्पित आहे. तसेच स्वर्गाचा कोषाध्यक्ष कुबेराला देखील समर्पित आहे. या दिवशी भाविकांनी ब्रह्म मुहूर्तावर उठून पवित्र नद्यांमध्ये स्नान करावे असे सांगितले जाते.

**अक्षया तृतीया पुण्या सर्वपापप्रणाशिनी ।**
**दानधर्मप्रिया नित्यं विष्णुलक्ष्मीप्रपूजिता ।।**

या श्लोकाप्रमाणे अक्षय तृतीया या दिवशी आपण भगवान विष्णू, देवी लक्ष्मी आणि भगवान कुबेर यांच्या पूजनाच्या वेळी मूर्तींना पिवळी फुले, चंदन, धूप आणि दिवा अर्पण करावी.

तसेच या दिवशी भगवानांना सत्तू, काकडी, हरभरा डाळ आणि टरबूज, खरबूज अशी फळे अर्पण करा. तसेच काही ठिकाणी ह्या दिवशी आंबा ह्या फळाचा नैवेद्य दाखवून या फळाचा आस्वाद घेण्यास सुरुवात करतात.

हीसगळी पूजा करत असताना ॐ नमो भगवते वासुदेवाय हा मंत्र प्रभावी ठरतो म्हणून याचा जप करावा असे मानले जाते.

अक्षय तृतीया ही एक शुभ तिथी आहे, चैत्र शुद्ध तृतीयेपासून ज्या घरांमध्ये चैत्र गौरीचे आगमन झालेले असते तो या दिवशी

समाप्त होतो. म्हणून या दिवशी देवीचे पूजन करून छान सजावट व आरास करण्यात येते. आरास करण्यासाठी टरबूज, खरबूज, कैऱ्या, पाने फुले यांचा समावेश केला जातो. तसेच स्त्रीयांना हळदी कुंकू देऊन प्रसाद म्हणून डाळ कैरी व थंडगार कैरीचे पन्हे दिले जाते.

आपण असे पाहतो की, या जगात फक्त आपण करत असलेल्या चांगल्या कर्मांशिवाय सर्व काही नाशवंत आहे.

जसे सोने खरेदी करणे समृद्धीचे प्रतीक आहे तसेच दुःखींचे अश्रू पुसणे आणि भुकेल्यांना अन्न दान करणे ही समृद्धी मनुष्याला अधिक लाभदायी व 'शाश्वत' बनवते. या अखा तीजमध्ये, आपण केवळ स्वतःसाठी समृद्धी शोधू नये, तर जगातील सर्व प्राण्यांच्या कल्याणासाठी प्रार्थना करावी. आपल्या आत्म्यांना जागृत करून आणि सेवा, ध्यान आणि भक्तीच्या मार्गावर पुढे जाऊन वाटचाल करावी. म्हणूनच आपण देवाला प्रार्थना करतो की, या अक्षय तृतीयेला धार्मिकतेचा प्रकाश, सेवेची भावना आणि सद्गुणाचा अक्षय प्रवाह प्रत्येकाच्या जीवनात नेहमीच राहो.

**अक्षय्यं फलमाप्नोति दानेन विधिपूर्वकम् ।**
**तृतीयायां तु यः कुर्यात् पुण्यं तस्य न नश्यति ।।**

जो व्यक्ती अक्षय तृतीयेच्या दिवशी नियमाने दान आणि पुण्यकर्म करतो, त्याला कधीही न संपणारे पुण्य मिळते.

अक्षय तृतीयेला दानाचे महत्त्व हे भौतिक सुखांच्या पलीकडे आहे असे शास्त्रात म्हटले आहे. या दिवशी दान केल्याने व्यक्तीचे संचित पाप नष्ट होते.

अक्षय तृतीयेय दानम, पुण्यम च न क्षीयते।

म्हणजेच, अक्षय तृतीयेला केलेले दान आणि मिळवलेले पुण्य कधीच संपत नाही. सनातन परंपरेत असे मानले जाते की, या दिवशी दान केल्याने धनाची हानी होत नाही, तर संपत्ती आणि समृद्धी वाढ होते.

अक्षय तृतीयेला विविध प्रकारे दान केले जाते.

**अन्नदान:**

धार्मिक ग्रंथांमध्ये अन्नदान परम दानम, म्हणजे अन्न, हे परम देव मानले जाते. अक्षय तृतीयेला भुकेल्या व्यक्तीला अन्न देणे हे स्वतः भगवान नारायणाची सेवा करण्यासारखे आहे. उन्हाळा सुरू झाल्यामुळे, या दिवशी सत्तू (सत्तू), गूळ दान करणे याला विशेष महत्त्व आहे.

**जलदान:**

तहानलेल्यांना पाणी देणे हे मानवतेचे सर्वात मोठे कार्य आहे. या दिवशी मातीच्या भांड्यात (कुंभात) पाणी दान केल्याने पूर्वजांच्या आत्म्याला तृप्ती मिळते.

**वस्त्रदान:** गरिबांना त्यांचे शरीर झाकण्यासाठी कपडे द्या.

**गायदान:** ब्राह्मणांना गाय दान करणे आध्यात्मिक प्रगतीसाठी उत्तम मानले जाते.

**पादुका दान:** या कडक उन्हात ये-जा करणाऱ्यांना जोडे किंवा चप्पल दान करणे अत्यंत पुण्यपूर्ण आहे.

अक्षय तृतीयेला दान करणे म्हणजे केवळ भौतिक गोष्टींचा त्याग नाही तर अहंकाराचे विसर्जन आहे. ते आत्म्याला शुद्ध करते आणि कर्माच्या साखळीत बीज पेरते ज्याचे फळ आपल्या पुढील पिढ्यांना देखील मिळते.

असा हा वैशाख मासात येणारा सण साडेतीन मुहूर्तातील एक आहे . म्हणूनच तर याचे महत्व खूप आहे. हा सण समृद्धी देणारा तर आहेच शिवाय दान धर्म करायला देखील शिकवणारा आहे. लक्ष्मी विष्णू व कुबेर पूजन, गौरी पूजन, पितरांचे पूजन असे विविध प्रकारे पूजन करून मनुष्याच्या जीवनात सुख आणि समाधान निर्माण होते. दानाचे महत्त्व शिकवणारा हा सण आपल्याला विचारांनी देखील समृद्ध करतो आणि म्हणूनच या दिवशी केलेले कार्य हे अक्षय आहे हेच खरे!!

**ॲड. स्वाती जेरे, नाशिक**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

# प्रसंगावधान - एक स्वानुभव

हिंदूबोध या विश्व हिंदू परिषदेचा मासिकासाठी एखादा लेख पाठवा असा निरोप मिळाल्यावर वैद्यकीय व्यवसायातील अनुभवांची मालिकाच पुढे चालू ठेवावी असे वाटले आणि त्यानिमित्ताने माझ्या प्रॅक्टिस मधील एक महत्त्वाचा प्रसंग स्वानुभवच या लेखासाठी मी निवडला आहे.

प्रसंगावधान म्हणजे प्रसंगानुरूप वागण्याचे आवधान. सतर्कपणे, सद्सद्विवेक बुद्धीने, आपण सावधानतेने तो प्रसंग हाताळणे होय. वैद्यकीय व्यवसायामध्ये प्रत्येक डॉक्टरांच्या आयुष्यात याला खूपच महत्त्वाचे स्थान आहे आणि अशा अनेक प्रसंगांना गंभीरपणे आत्मविश्वासाने तोंड दिल्यास आपण त्यातून सुखरूपपणे बाहेर पडू शकतो हे प्रत्येक डॉक्टरने कायम लक्षात ठेवले पाहिजे. अनेकदा समाजातील उच्चभ्रू व्यक्ती, राजकारणी कार्यकर्ते ,पुढारी, समाजकंटक लोक, पेशंटचे कुटुंबीय, नातेवाईक, गुंड प्रवृत्तीचे लोक या सर्वांशी आपला कोणत्या ना कोणत्या कारणाने संबंध येतो व तो प्रसंग डोक्यावर बर्फ व जिभेवर गोडवा ठेवून कसा हाताळावा? आणि समोरच्या व्यक्तीला शांत कसे करावे? यासाठी प्रसंगावधान खूपच उपयोगी पडते हे निश्चित. असा एक माझ्याकडे घडलेला प्रसंग आपणासमोर ठेवत आहे.

निवडणुका जवळ आल्यावर सर्वच राजकारणी पुढाऱ्यांचे त्यांच्या कार्यकर्त्यांना सांभाळून घेण्याचे धोरण असते व त्यांना इतरांनाही दुखवायचे नसते. असाच एक प्रसंग दहा–बारा वर्षांपूर्वी घडला होता. एके दिवशी रात्री दहाच्या सुमारास आमच्या भागातील एक राजकीय पुढारी एका कार्यकर्त्यांस माझ्याकडे उपचारासाठी घेऊनआले. आमची चांगली ओळख असल्यामुळे व त्यांचे बरेच पेशंट माझ्याकडे येत असल्याने मला ते रात्री उशिरा आले तरी काहीतरी इमर्जन्सी असेल हे ओळखून मी ताबडतोब त्यांचा पेशंट बघण्यास हॉस्पिटलमध्ये गेलो. कन्सल्टिंग मध्ये बसल्यावर व त्यांच्याशी थोड्या जनरल गप्पा झाल्यावर त्यांना त्यांच्याबरोबरच्या 'व्यक्तीस काय आजार आहे'? असे विचारले असता त्यांनी 'मी आज जरा दुसऱ्याच एका कामासाठी आपल्याकडे आलो आहे' असे सांगितले.

त्यांनी त्या व्यक्तीशी माझी ओळख करून दिली व मला सांगितले की ''या महिन्याच्या वीस ते बावीस तारखेपर्यंत ही व्यक्ती तुमच्या हॉस्पिटलमध्ये भरती (admit) होती अशी नोंद करा, तुम्हाला योग्य वाटेल असा आजार लिहा व त्याचा उपचाराचा (indoor) पेपर ही बनवा. त्याला त्याची खूप आवश्यकता आहे व तो अडचणीत आहे. हे ऐकल्यावर मला जरा धक्काच बसला कारण इतके वर्षाच्या व्यवसायात अशा प्रकारे काही खोटेनाटे करण्यास सांगणारे कोणीच कधीच माझ्याकडे आले नव्हते. तेव्हा मी थोडा भांबावून गेलो व मला काय करावे हे सुचेनासे झाले कारण समोर बसलेली व्यक्ती खूपच प्रतिष्ठीत आणि नावाजलेली होती, मला त्यांच्याबद्दल आदरही होता म्हणून असे करण्यास ते का सांगत आहेत हे ही कळत नव्हते.

वैद्यकीय व्यवसाय करताना पैशाच्या मागे न लागता हे एक नोबल प्रोफेशन सेवाभावी वृत्तीने स्वीकारलेले होते व त्यामध्ये खोटी सर्टिफिकेट्स न देणे, खोटी बिले न देणे, जरूर नसताना ऑपरेशन्स न करणे, पेशंटला योग्य तो सल्ला देऊन जरूर पडल्यास मोठ्या हॉस्पिटल कडे पाठवणे वगैरे अनेक तत्त्वे मी पाळली होती. त्यामुळे माझ्या तत्वनिष्ठा स्वभावाला असे काही वावगे चुकीचे करण्यास मन तयार होईना. आता प्रसंग बाका`ष होता. समोरच्याना दुखवायचे तर नव्हते आणि चुकीचे करायचे पण नव्हते.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

अशावेळी क्षणभर सद्गुरूंचे स्मरण करून विचार करून शांतपणे मी त्यांना सांगितले की सर आजपर्यंत मी कशी (तत्त्वनिष्ठ) प्रॅक्टिस करतो आहे ते आपण जाणताच. आपले अनेक पेशंटही येथून बरे होऊन गेले आहेत व आपल्या सांगण्याप्रमाणे मी अनेकदा बिलातही त्यांना सूट दिली आहे. पण हे गृहस्थ ॲडमिट होते हे कागदोपत्री मला दाखवणे शक्य नाही. कारण एक तर माझ्या तत्वात ते बसत नाही आणि वीस तारखे नंतर पुढे पंधरा दिवसात माझ्याकडे दहा–बारा ॲडमिशन झालेल्या आहेत. प्रत्येकाचे तारीख, वार, टाइमिंग लिहिलेले असते त्यामुळे बॅक डेटेड ॲडमिशन मला दाखवता येणार नाही. तेव्हा कृपया आपण मला समजून घ्या. असे म्हणून मी त्यांना माझे इंडोअर ॲडमिशन रजिस्टर दाखवले व पुढे झालेल्या ॲडमिशनस ही दाखवल्या व त्यामध्ये खाडाखोड करणे शक्य नाही असे सांगितले.

तेव्हा त्यांच्या बरोबर आलेल्या त्या व्यक्तीने दहा हजार रुपयांचे बंडल माझ्या टेबलावर ठेवून मकितीही पैसे घ्या पण मी इथे ॲडमिट होतो असे दाखवाफ असे म्हणून गयावया केली. त्याकाळी रुपये दहा हजार ही रक्कम ही खूप मोठी होती. आत्तापर्यंत सचोटीने प्रॅक्टिस करून परमेश्वर कृपेने जे काही मिळत आहे त्यात मी खूप समाधानी आहे व तुमच्या बरोबर आलेल्या या पुढारी साहेबांना ही याची पूर्ण कल्पना आहे तेव्हा कृपया आपले माझ्याकडे काम होणार नाही असे स्पष्ट सांगितले. तेव्हा शांतपणे ती रक्कम नाकारून मी त्यांना परत पाठवले.

हे सर्व करताना व मनात काहीही होऊ शकते याची भीती असताना, केवळ शांतपणे विचार करून आणि परमेश्वरावर भरोसा ठेवून हे सर्व करण्याचे धैर्य मात्र त्या क्षणी मला आले हे विशेष. त्याबरोबरच त्या राजकीय नेत्याचे चांगले संबंधही याला कारणीभूत होते.

मी दुसरीकडे जाईन पण इथे कोण दुसरे डॉक्टर आम्हाला असे करून देतील? असे त्याने विचारले असता 'मला याबाबत काही माहीत नाही' असे मी स्पष्ट सांगितले व त्यांना निरोप दिला. त्यानंतर ही गोष्ट मी पूर्णपणे विसरून गेलो होतो.

पंधरा दिवसांनी त्यांच्या वडिलांना बरे नाही म्हणून तपासणी साठी हे पुढारी त्यांना माझ्याकडे घेऊन आले असता त्यांना तपासून उपचार दिल्यानंतर त्यांनी हा विषय काढला व मला म्हणाले मसर खरे तर मी त्या व्यक्तिला फार ओळखत नाही कारण तो लातूरचा आमच्या पक्षाचा कार्यकर्ता, तिथल्या नेत्याने सांगितले म्हणून तो माझ्याकडे आला. तुमच्या ओळखीच्या डॉक्टर कडे मी ॲडमिट होतो असे दाखवायचे आहे, मला त्याची खूप जरुरी आहे असे खूप वेळा गयावया करून सांगत होता म्हणून मी त्याला तुमच्याकडे घेऊन आलो. माझे डॉक्टर अशा गोष्टी करत नाहीत हे मी त्याला निक्षून सांगितले पण तो ऐकेनाच. म्हणून शेवटी घेऊन आलो होतो. पण तुम्ही त्याला ॲडमिट दाखवले नाही हे खूपच बरे झाले कारण नंतर मला समजले की वीस तारखेला लातुर मध्ये त्याने कोणाची तरी भांडणातून हत्या केली होती व पोलीस त्याच्या मागे लागल्यानंतर त्यावेळेस तो लातूरमध्ये नव्हता असे त्याला सिद्ध करावयाचे होते म्हणून तो इथे कोणत्यातरी रुग्णालयात ॲडमिट होता असे त्याला दाखवायचे होते. (हे सर्व लातूर मधील त्यांच्या पक्षाच्या नेत्याने नंतर चिंचवड मधल्या या पुढाऱ्यास सांगितले होते) तेव्हा सर तुम्ही व मी दोघेही यातून सुखरूप वाचलो नाही तर ही ॲडमिशन आपल्याला केवढ्याला पडली असती असे त्यांनी सांगून माझे आभार च मानले त्यामुळे आमचे ऋणानुबंध ही चांगले राहिले.

खरोखर हे सर्व समजल्यानंतर परमेश्वराने दिलेल्या प्रसंगावधानाने, नैतिक पाठबळाने, क्षणभरात सुचलेल्या विवेकाने सद्बुद्धीमुळे एका मोठ्या संकटातून मी वाचलो होतो हे खरे. म्हणूनच म्हणतात की,

कठीण समय येता कोण कामास येतो तर देवच कामास येतो कारण तो त्याप्रसंगी विवेक व सद्बुद्धी देतो आणि अडचणीतून सुटका करतो.

**डॉक्टर संजीव दाते**

**जनरल सर्जन चिंचवड**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# डॉ. आंबेडकर - स्वा. सावरकर आणि चवदार तळे खटला

चवदार तळ्याची कोर्ट केस– सावरकरांची साक्ष आणि डॉ आंबेडकरांची वकिली

स्वातंत्र्यपूर्व काळात अस्पृश्याना सार्वजनिक स्थळी पाणी पिण्याचा हक्क बहुतेक ठिकाणी नाकारला जात होता. डॉ आंबेडकरांनी याविरुद्ध मोठी चळवळ उभारली. आणि सवर्णांचा विरोध झुगारून महाडच्या चवदार तळ्यात सर्वजातीय हिंदू पाणी प्याले . त्याविरुद्ध रूढीवादी सवर्णांनी कोर्टात केस केली होती. ती कोर्ट केस चवदार तळ्याची कोर्ट केस म्हणून ओळखली जाते. चंद्रकांत खैरमोडे लिखित डॉ आंबेडकर चरित्रात चवदार तळ्याच्या केसमधील साक्षी पुराव्यांची माहिती आली आहे. हे चरित्र चौदा खंडात लिहिलेले अभ्यासपूर्ण आणि सविस्तर डॉक्युमेंटेशन आहे. यातीलतिसर्या खंडात पृष्ठ २५१ पासून महाडच्या चवदार तळ्याच्या केस मधील साक्षी आहेत . हा कोर्ट केस चा भाग असल्याने. सरकारदरबारी अंकित झालेला महत्वाचा भाग आहे. हा खटला अनेकवर्षे चालला या केस मध्ये (पूर्व) अस्पृश्यांच्या बाजूने साक्षि देणार्यांची नावे आहेत. त्यातले दुसरे नाव डॉ ना दा सावरकर असे आहे. सावरकरांचा लहान भाऊ नारायण सावरकर अस्पृश्यांच्या बाजूने साक्षिदार होता असे खैरमोडे यांनी नमूद केले आहे. चांगदेव खैरमोडे हे बाबासाहेबांचे सहकारी आणि विश्वसनीय चरित्रलेखक म्हणून मान्यता प्राप्त आहेत. (खैरमोडे खंड ३पृष्ठ २५७). सावरकर स्वत: ब्रिटिशांच्या स्थानबद्ध्तेत होते म्हणून स्वत:च्या लहान भावास या उलाढालीत पाठवले होते. याच केस मध्ये डॉ आंबेडकर यांची साक्ष झालेली आहे.

कोर्टा पुढिल साक्षित बाबासाहेब म्हणतात –

आपल्यामध्ये हिंदु समाजाचे संघटन व ऐक्य व्हावे आणि परधर्मियांचे हल्ले हिंदु धर्मियांवर होऊ नयेत , ह्या बाबतीत डॉ सावरकर यांचे ह्यांचे जे प्रयत्न चालू आहेत. त्या बाबतीत डॉ सावरकर यांचे व माझे एकमत असून सहकार्य हि आहे.

(खैरमोडे खंड ३पृष्ठ २५५)

ही डॉ आंबेड्करांनि कोर्टासमोर दिलेली साक्ष आहे. त्यात सावरकरांच्या भावाशी असलेल्या सहकार्याचा व कोणत्या मुद्द्यावर हे सहकार्य आहे त्याचा अतिशय स्पष्ट उल्लेख येतो. हिंदुचे हित करण्यास जातिभेद मोडण्यासाठी सहकार्य आणि इतरत्र नाही

(ब्रिटिशसरकारविरोधी क्रांतिकार्य –वगैरे गोष्टीत नाही ). अशी भूमिका बाबासाहेबांनी कोर्टात घेतली आहे.बाबासाहेब निष्णातवकील आणि कायद्याचे तज्ञ होते.

बाबासाहेबांच्या चवदार तळ्याच्या आंदोलना नंतर तळे बाटले असा ओरडा मूर्ख सनातन्यांनि सुरु केला – त्याला सावरकर पक्षाचे तरूण विरोध करू लागले – सनातन्यांचि टिंगल करू लागले हा इतिहास आहे.

या संदर्भात बाबासाहेबांच्या जनता पत्रातील समकालीन लिखाण महत्वाचे आहे .सावरकर पक्षाचे तरुणहा उल्लेख बाबासाहेबांच्या जनता पत्रातील आहे. (जनता पत्र १ मार्च १९३१ )

त्यात पुढे असेही लिहिलेले आहे कि,

चवदार तळे बाटले म्हणुन काही सनातनी ते तळे शुद्ध करून घेत होते त्याला सावरकर पक्षाच्या तरुणांनी हरकत घेतली आणि शुद्ध कराल तर आमच्या घरातील अशुद्ध पाणि

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

आणुन तळ्यात पुन्हा टाकू पुन्हा शुद्धी केली तर पुन्हा टाकू – तुम्हाला सतावून सोडू !असे सनातन्यांना बजावले. (डॉ आंबेडकरांचेजनता पत्र १ मार्च १९३१ )

जनता पत्र पुढे म्हणते: –

सावरकर पक्षाचा याहिपेक्षा मोठा विजय विश्वेश्वराच्या सार्वजनिक भोजनात झाला , (तेथे जातीनुसार वेगळ्या पंगती बसत असत.) – सावरकर पक्षिय तरुणांना आमंत्रण नव्हते , तरी देवीच्या प्रसादासाठी त्या घरातील सावरकरपक्षिय तरुण तेथे उपस्थित होऊन प्रत्येक रांगेत एक एक घुसला , म्हाताऱ्या कोताऱ्या लोकांची धांदल उडाली! धर्म बुडाला! देव भ्रष्ट झाला असा आक्रोश सुरु झाला. शेवटी एकच पंगत बसली (डॉ आंबेडकरांचेजनता पत्र १ मार्च १९३१ )

सावारकरांनी अनेक जुनी मंदिरे दलितांना उघडी करून दिली होती, काही आंतरजातीय विवाह लावून दिले होते हे पतित पावन मंदिरापेक्षा अधिक महत्वाचे आहे. डॉ आंबेडकरांच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाला आणि चवदार तळे आंदोलनालासावरकरांनि अतिशय सक्रिय पाठिंबा दिला होता.

डॉ आंबेडकरांनी या कामाबद्दल सावरकरांचे कौतुक करणारे पत्र लिहिले होते. आंबेडकर लिहितात –

नुसति अस्पृश्यता जाउन भागणार नाही . चातुर्वण्याचे उच्चाटन झाले पाहिजे . ज्या थोड्या लोकांना ह्याची आवश्यकता पटलि आहे , त्यापैकी आपण एक आहात हे सांगावयास मला आनंद वाटतो. डॉ आंबेडकर (कीर लिखित आंबेडकर चरित्र पृष्ठ २३९, सहावी आवृत्ती)

बाबासाहेब केवळ एवढ्यावर थांबलेले नाहित. बाबासाहेब मुंबईच्या प्रांतिक विधिमंडळात नियुक्त आमदार होते. २७ सप्टेंबर १९२७ रोजी त्यांनी सभापतिंकडे ठराव पाठवला कि सावरकरांची रत्नागिरी स्थानबद्धतेतून मुक्तता करण्यात यावी जेणेकरुनत्यांचे कार्य देशभर चालावे.

(पृ. ७३ शोध सावरकरांचा – य दि)

आणि नाशिकचे काळाराम मंदिर :–

भारताच्या राजकीय स्वातंत्र्याच्या आसपास बहिष्कृत वर्गाने त्यांच्या सामाजिक न्यायाची चळवळ सुरु केली होती . सर्व हिंदू जातींना मंदिर प्रवेश मिळावा – हे त्यातले एक आंदोलन होते. असेच मंदिर प्रवेश आंदोलन डॉ आंबेडकरांनी नाशिक काळाराम मंदिर येथे केले होते.

डॉ आंबेडकरांनी केलेल्या नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहा वेळेला डॉनारायणराव सावरकर यांना तात्यारावानी – सवर्णांना समज देण्यासाठी धाडले होते. एकटे नारायणचनव्हे तर रत्नागिरी हिंदु सभेचे अनेक कार्यकर्ते नाशिकात दाखल झाले होते.

सावरकर, उदगावकर व धडफ़ळे यांनी मंदिरात जिथपर्यंत सवर्णांना प्रवेश आहे तिथपर्यंत अस्पृश्यना ही प्रवेश दिला पाहिजे अशी भूमिका मांडली. सनातन्यांनि सावरकरांची मागणी धुडकावुन लावली. (पृष्ठ १३,आंबेडकरी चळवळ , य दि फडके)

नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाला पाठिंबा देणारे व नाशिककर हिंदुबंधूंना विनंती करणारे वि दासावरकरांनी लिहिलेले पत्र बोलके आहे. सावरकरांनी सवर्णाना माफी मागायचा सल्ला दिला आहे.सावरकर लिहितात :

यास्तव पूर्वास्पृश्य हिंदुबंधू मंदिरापाशी येताच तुम्ही त्यांचे उत्कट प्रेमाने स्वागत करा.आणि.. दोन्ही कर जोडून झाल्या गेल्याची क्षमा याचना करा. – सावरकरांचे पत्र

१९३१ला मम्मुंबई इलाखा अस्पृश्यता परिषदेफ्च्या अध्यक्षपदावरून रत्नागिरी येथे भाषण करताना काळाराम मंदिर सत्याग्रहाचा उल्लेख करून सावरकर म्हणाले:

मी मोकळा असतो तर काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात स्वत: झुंजलो असतो.

१९५० च्या दशकात डॉ आंबेडकर आणि सावरकर यात बौद्ध धर्मांतरावरून मोठा वाद झाला होता . त्या वादाचे अंतरंग उलगडायला स्वतंत्र लेख लिहावा लागेल. पण ..


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**




मुद्यांवर वेळोवेळी हायकोर्टाने खालील कोर्टाकडून माहिती गोळा केली. या कामास चार वर्षे लागली. (तसेच श्री. पालयेशास्त्री, डॉ. ना. दा. सावरकर, बाळ गंगाधर खेर) इत्यादिकांच्या साक्षी अस्पृश्यांतर्फे हायकोर्टात झाल्या. शेवटी जस्टिस ब्रूमफिल्ड व जस्टिस वाडिया यांनी १७ मार्च १९३७ला सवर्ण हिंदूंचे अपील फेटाळले. चवदार तळ्याची जमीन कोणाच्या मालकी हक्काची आहे, हे सवर्ण हिंदूंना सिद्ध करता आले नाही, म्हणून ती जमीन सरकारी मालकीची म्हणजे सार्वजनिक ठरते आणि चवदार तळ्यात अस्पृश्यांना पाणी भरण्याचा हक्क नाही हे कित्येक पिढ्यांच्या वहिवाटीवरून दिसून येते-यात शंभर टक्के कायदेशीरपणा आहे, असे वाटत नाही, असा न्यायमूर्तिद्वयींनी निर्णय देऊन सवर्ण हिंदूंचे अपील फेटाळून लावले. हायकोर्टाच्या या

फिर्याद ❑ २५७

नव्हते.

नाशिकात ते आमच्या सत्याग्रहाच्या वेळी अस्पृश्यांना देवदर्शन घेऊ द्यावे, अशा संबंधी स्पृश्य लोकांत मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करीत होते. आपल्यामध्ये हिंदू समाजाचे संघटन व ऐक्य व्हावे आणि परधर्मीयांचे हल्ले हिंदुधर्मीयांवर होऊ नयेत, ह्या बाबतीत डॉ. सावरकर ह्यांचे जे प्रयत्न चालू आहेत त्या बाबतीत डॉ. सावरकर यांचे व माझे एकमत असुन सहकार्यही आहे. पण इतर बाबतीत त्यांचे माझे सहकार्य नाही. माझे सभेदार पालयेशास्त्री ह्यांच्यावर मी उपकार केलेले नाहीत. बदलापूर येथे शिवाजी उत्सवात जो हिंदू-मुसलमानांचा दंगा झाला त्यावेळी पालयेशास्त्री यांजवर फौजदारी फिर्याद झाली होती.

या फिर्यादीत एकंदर १९ हिंदू आरोपी होते व त्या १९ आरोपीत ते एक आरोपी होते. ह्या आरोपीचे मी वकीलपत्र घेतले होते व त्यांच्या वकीलपत्राबद्दल मी फी पण घेतली होती. पालयेशास्त्री यांजवर फिर्याद झाली त्याच्या अगोदरपासून त्यांचा व माझा स्नेहसंबंध आहे. मागे २ हजार अस्पृश्य लोकांनी श्रावणात यज्ञोपवीते धारण केली त्यावेळी त्यांना समाज समता संघाकडून २०/२५ रुपये दक्षिणा देण्यात आली होती. नेहमी ते दरसालच्या अस्पृश्यांच्या श्रावणी समारंभास हजर नसतात. सुरेंद्रनाथ टिपणीस हे मला दाव्याचे कामी जरूर ती मदत करीत आहेत.

अस्पृश्यांची जी महाडास परिषद झाली त्या परिषदेची पूर्व खटपट व तयारी अनंत विनायक चित्रे यांनी केली. सुरेंद्रनाथ टिपणीस यांचे ते मेहुणे आहेत. १९२७ च्या दुसऱ्या कॉन्फरन्सनंतर त्यांचा व माझा स्नेहसंबंध जुळला व तो अद्याप आहे. महाडास

फिर्याद ❑ २५५

समाज सुधारक सावरकरांना बाबासाहेबांचा पाठिंबा होता. चवदार तळे ते पतित पावन मंदिर म्हणजे साधारण १९३४ सालपर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ आंबेडकर यांच्यात सहकार्याचे सबंध होते. यात काही कुरबुरी., थोडी स्पष्टीकरणे आहेतपण मुख्यत: या काळात त्यात फारसा संघर्ष दिसत नाही. असेलच तर ऐक्य आणि मनोमिलन दिसते. महत्त्वाचे म्हणजे सावरकर आणि आंबेडकर यातला सुसंवाद आंबेडकरांनी मनुस्मृती जाळल्या नंतर सुद्धा टिकून राहिला होता.

चवदार तळे, काळाराम मंदिर संबंधित घटना वीर सावरकरांच्या हिंदुत्वाची सामाजिक जाणीव दाखवतात आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीतला राष्ट्रवाद दाखवतात. दोन राष्ट्रपुरुषांचे सर्व विचार एक असू शकत नाहीत. जिथे ते विचार जुळतात ते दाखवून देणे मात्र रचनात्मक आहे, अगत्याचे आहे.

**डॉ. अभिराम दीक्षित**


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

संवाद

**संवाद ट्रेडप्रिंट्स**

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी-७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे - ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

**Email : sanwadpvt@gmail.com**


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# मंदिर और मेरी जिम्मेदारी

भारत में, भक्ति और पवित्रता के प्रतीक के रूप में मंदिरों और घरों में भगवान को फूल चढ़ाए जाते हैं। प्रतिदिन हजारों किलोग्राम फूल धार्मिक अनुष्ठानों में उपयोग किए जाते हैं। पूजा के बाद, कई भक्त इन फूलों को पवित्र नदियों जैसे कि और में विसर्जित करते हैं। हालांकि यह प्रथा आस्था और परंपरा में निहित है, लेकिन फूलों की बढ़ती मात्रा ने पर्यावरणीय चिंताएँ पैदा कर दी हैं।

जब फूल और अन्य धार्मिक चढ़ावे नदियों में फेंके जाते हैं, तो वे बड़ी मात्रा में जमा हो जाते हैं। हालांकि फूल जैविक रूप से विघटित हो जाते हैं, लेकिन उनमें अक्सर कीटनाशक और रासायनिक रंग होते हैं। इसके अलावा, चढ़ावे अक्सर प्लास्टिक बैग, कपड़े या सिंथेटिक सामग्री में लपेटे जाते हैं। ये सामग्रियाँ पानी को प्रदूषित करती हैं, ऑक्सीजन का स्तर कम करती हैं, जलीय जीवन को नुकसान पहुँचाती हैं और नदियों को गंदा और अस्वस्थ बनाती हैं।

**पर्यावरणीय प्रभाव** : मंदिरों के फूलों को नदियों में फेंकने से जल प्रदूषण होता है और पारिस्थितिकी तंत्र प्रभावित होता है। सड़ते हुए फूल पानी के प्राकृतिक संतुलन को बिगाड़ सकते हैं, जबकि प्लास्टिक और अजैविक रूप से विघटित होने वाली सामग्री लंबे समय तक नदियों में बनी रहती है। यह प्रदूषण उन समुदायों को भी प्रभावित करता है जो दैनिक उपयोग के लिए नदी के पानी पर निर्भर हैं।

**संभावित समाधान** : मंदिरों के पुष्प अपशिष्ट के ज़िम्मेदारीपूर्ण प्रबंधन के लिए एक सतत दृष्टिकोण आवश्यक है।

- खाद बनाना: फूलों को एकत्रित करके बगीचों और कृषि के लिए जैविक खाद में परिवर्तित किया जा सकता है।
- उपयोगी उत्पादों में पुनर्चक्रण: सूखे फूलों का उपयोग अगरबत्ती, प्राकृतिक रंग, इत्र और जैव–अपघटनीय उत्पाद बनाने में किया जा सकता है।
- अलग संग्रहण प्रणाली: मंदिर पुष्प अर्पण के लिए विशेष डिब्बे स्थापित कर सकते हैं ताकि उन्हें नदियों में न फेंका जाए।
- जागरूकता कार्यक्रम: भक्तों को पवित्र फूलों का पर्यावरण के अनुकूल तरीके से निपटान करने के लिए प्रोत्साहित किया जाना चाहिए।

मंदिर आधारित पुनर्चक्रण पहल: मंदिर परिसर के भीतर छोटे पुनर्चक्रण या खाद बनाने की इकाइयाँ स्थापित की जा सकती हैं।

आधुनिक युग में मंदिरों के सामुदायिक मूल्यों को बनाए रखने के लिए, इनका उपयोग केवल पूजा–पाठ के लिए ही नहीं, बल्कि सामाजिक और सांस्कृतिक गतिविधियों के लिए भी किया जा सकता है।

आज इन मूल्यों को बनाए रखने के तरीके:

**शिक्षा कार्यक्रम**

मंदिर भगवद् गीता जैसे धर्मग्रंथों, भाषा पाठों और नैतिक मूल्यों की शिक्षा देने के लिए कक्षाएं आयोजित कर सकते हैं।

**सामुदायिक सभाएं**

लोग मंदिरों में सामाजिक मुद्दों पर चर्चा करने और समुदाय के भीतर संबंधों को मजबूत करने के लिए मिल सकते हैं।

**सांस्कृतिक गतिविधियां**

सत्संग का आयोजन किया जा सकता है श्र

संगीत जैसी पारंपरिक कलाओं को बढ़ावा दे सकते हैं और दिवाली जैसे त्योहारों का आयोजन कर सकते हैं।

**दान और सामाजिक सेवा**

भोजन वितरण का आयोजन करना, गरीबों की मदद करना और जरूरतमंद बच्चों की शिक्षा में सहयोग करना।

**युवाओं की भागीदारी स्वयंसेवा और सामाजिक कार्य**

युवाओं को दान–पुण्य गतिविधियों में भाग लेने के लिए प्रोत्साहित करें, , पर्यावरण संरक्षण और जरूरतमंदों की सहायता करना।

जरूरतमंद बच्चों को कंप्यूटर की बुनियादी जानकारी सिखाना और स्कूल के होमवर्क में मदद करना / अध्ययन केंद्र

मंदिरों में कार्यशालाएं, कहानी सुनाने के सत्र और वेदों जैसे ग्रंथों की शिक्षाओं पर चर्चा आयोजित की जा सकती है। आइए हम सब मिलकर यह करें।

**माधवी सौशी**

# ओळख स्तोत्रांची भाग १ : हनुमान चालीसा (मराठी अर्थासह)

हनुमान चालीसा ही १६ व्या शतकात गोस्वामी तुलसीदास यांनी रचलेली हनुमानजींची ४० चौपायांची (श्लोक) स्तुती आहे. ही अवधी भाषेत असून, दररोज पठण केल्याने भीती, नकारात्मकता दूर होऊन आत्मविश्वास वाढतो, मानसिक शांतता मिळते आणि संकटे दूर होतात २, ४, ९. हे स्तोत्र भक्तांना शक्ती, बुद्धी आणि विद्या देणारे मानले जाते.

**श्री गुरु चरण सरोज रज, निज मन मुकुरु सुधारि।**
**बरनऊं रघुवर बिमल जसु, जो दायकु फल चारि।**

अर्थ – श्री गुरु महाराजांच्या चरण कमळांच्या धुळीने आपल्या मन रुपी आरशाला पवित्र करून श्री रघुवीरांचे निर्मल यशाचे वर्णन करत आहोत, जे की चारी फल धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष प्रदान करणारे आहे.

**बुद्धिहीन तनु जानिके, सुमिरो पवन–कुमार।**
**बल बुद्धी विद्या देहू मोहिं, हरहु कलेश विकार।**

अर्थ– हे पवन कुमार! मी आपलं सुमिरन करतो. माझं शरीर आणि बुद्धी निर्बल असल्याचं आपण तर जाणतात. मला शारीरिक बल, सद्बुद्धी आणि ज्ञान देऊन माझे दु:ख आणि दोषांचे नाश करावे.

**जय हनुमान ज्ञान गुण सागर,**
**जय कपीस तिहुं लोक उजागर।।१।।**

अर्थ – श्री हनुमान जी! आपला विजय असो. आपलं ज्ञान आणि गुण अथाह आहे. हे कपीश्वर! आपली जय असो. तिन्ही लोक, स्वर्ग लोक, भूलोक आणि पाताल लोकात आपली कीर्ती आहे.

**राम दूत अतुलित बलधामा,**
**अंजनी पुत्र पवन सुत नामा।।२।।**

अर्थ – हे पवनसुत अंजनी नंदन! आपल्यासारखे दुसरे शक्तिशाली कोणी नाही.

**महावीर विक्रम बजरंगी,**
**कुमति निवार सुमति के संगी।।३।।**

अर्थ – हे महावीर बजरंग बली! आपणात विशेष पराक्रम आहे. आपण अशुद्ध बुद्धी दूर करणारे आणि शुद्ध बुद्धी प्रदान करणारे आहात.

**कंचन बरन बिराज सुबेसा,**
**कानन कुण्डल कुंचित केसा।।४।।**

अर्थ – आपण सोनेरी रंग, सुंदर कपडे, कानात कुंडल आणि कुरळे केसांनी सुशोभित आहात.

**हाथबज्र और ध्वजा विराजे,**
**कांधे मूंज जनेऊ साजै।।५।।**

अर्थ – आपल्या हातात बज्र आणि ध्वजा आहे आणि खांद्यावर मुंजीच्या जानव्याची शोभा आहे.

**शंकर सुवन केसरी नंदन,**
**तेज प्रताप महा जग वंदन।।६।।**

अर्थ – शंकराचे अवतार! हे केशरी नंदन आपल्या पराक्रम आणि महान यशाची संसार भरात वंदना होते.

**विद्यावान गुणी अति चातुर,**
**राम काज करिबे को आतुर।।७।।**

अर्थ– आपण प्रकांड विद्येचे ज्ञाता आहात, गुणवान आणि अत्यंत कार्य कुशल होऊन श्री रामाचे काम करण्यास उत्सुक असतात.

**प्रभु चरित्र सुनिबे को रसिया,**
**राम लखन सीता मन बसिया।।८।।**

अर्थ – आपण श्री राम चरित ऐकण्यात रस घेता. श्रीराम, सीता आणि लक्ष्मण आपल्या हृद्यात वास करतात.

**सूक्ष्म रूप धरि सियहिं दिखावा,**
**बिकट रूप धरि लंक जरावा।।९।।**

अर्थ– आपण आपलं लहानसा रूप धारण करून सीतेला दाखवले आणि भयावह रूप घेऊन लंकेला दहन केले.

**भीम रूप धरि असुर संहारे,**
**रामचंद्र के काज संवारे।।१०।।**

अर्थ – आपण विक्राळ रूप घेऊन राक्षसांचे वध केले आणि श्री रामचंद्रांच्या उद्देश्यांना यश मिळवून दिले.

**लाय सजीवन लखन जियाये,**
**श्री रघुवीर हरषि उर लाये।।११।।**

अर्थ – आपण संजीवनी बुटी आणून लक्ष्मणाचे प्राण वाचवले ज्याने आनंदी होऊन श्रीरामाने आपल्याला ह्रदयाशी लावले.

**रघुपति कीन्हीं बहुत बड़ाई,**
**तुम मम प्रिय भरत सम भाई।।१२।।**

अर्थ – श्री रामचंद्राने आपली खूप प्रशंसा केली आणि म्हटले की तुम्ही माझ्या भरत सारख्या भावाप्रमाणे आहात.

**सहस बदन तुम्हरो जस गावैं।**
**अस कहि श्रीपति कंठ लगावैं।।१३।।**

अर्थ – श्रीरामाने आपल्या हे म्हणत ह्रदयाशी लावले की तुमचं यश हजार मुखाने गाजवण्यासारखे सारखे आहे.

**सनकादिक ब्रह्मादि मुनीसा,**
**नारद, सारद सहित अहीसा।।१४।।**

अर्थ – श्री सनक, श्री सनातन, श्री सनन्दन, श्री सनत्कुमार आदि मुनी ब्रह्मा आदि देवता नारद, सरस्वती, शेषनाग सर्व आपले गुणगान करतात.

**जम कुबेर दिगपाल जहां ते,**
**कबि कोबिद कहि सके कहां ते।।१५।।**

अर्थ – यमराज, कुबेर इतर सर्व दिशांचे रक्षक, कवी, विद्वान, पंडित किंवा कोणीही आपल्या यशाचे पूर्णतः वर्णन करू शकत नाही.

**तुम उपकार सुग्रीवहि कीन्हा,**
**राम मिलाय राजपद दीन्हा।।१६।।**

अर्थ – आपण श्रीरामाशी सुग्रीवाची भेट करून उपकार केले, ज्यामुळे ते राजा झाले.

**तुम्हरो मंत्र विभीषण माना,**
**लंकेस्वर भए सब जग जाना।।१७।।**

अर्थ – आपल्या उपदेशांचे विभीषणाने पालन केलं ज्याने ते लंकेचे राजा झाले, हे सर्व जगाला माहिती आहे.

**जुग सहस्त्र जोजन पर भानू,**
**लील्यो ताहि मधुर फल जानू।।१८।।**

अर्थ – सूर्य अती दूर इतक्या अंतरावर आहे की तेथे पोहचण्यास हजार युग लागतात. अशा दोन हजार योजनांच्या अंतरावर स्थित सूर्याला आपण एक गोड फळ म्हणून गिळून गेला.

**प्रभु मुद्रिका मेलि मुख माहि,**
**जलधि लांघि गये अचरज नाहीं।।१९।।**

अर्थ – आपण श्री रामचंद्राची अंगठी मुखात ठेवून समुद्र पार केलं, यात आश्चर्य करण्यासारखं नाही.

**दुर्गम काज जगत के जेते,**
**सुगम अनुग्रह तुम्हरे तेते।।२०।।**

अर्थ – संसारात जितकेही अवघड काम असलं तरी ते आपल्या कृपेने सोपं होऊन जातं.

**राम दुआरे तुम रखवारे,**
**होत न आज्ञा बिनु पैसा रे।।२१।।**

अर्थ – श्री रामचंद्राचे दारावरील आपण राखणदार आहात, ज्यांच्या आज्ञेशिवाय कोणालाही आत प्रवेश मिळू शकत नाही अर्थात आपल्या प्रसन्न केल्याशिवाय राम कृपा दुर्लभ आहे.

**सब सुख लहै तुम्हारी सरना,**
**तुम रक्षक काहू को डरना ।।२२।।**

अर्थ – आपल्या शरणी येणारा प्रत्येक भक्त आनंद प्राप्त करतं, आणि आपण रक्षा करणारे असल्यावर भीती राहत नाही.

**आपन तेज सम्हारो आपै,**
**तीनों लोक हांक तें कांपै।।२३।।**

अर्थ – आपल्याशिवाय आपला वेग कोणीही थांबवू शकत नाही, आपल्या गर्जनाने तिन्ही लोक थरथर कापतात.

**भूत पिशाच निकट नहिं आवै,**
**महावीर जब नाम सुनावै।।२४।।**

अर्थ– जेथे महावीर हनुमानाचे नाव घेतलं जातं तेथे भूत–पिश्शाच जवळ देखील फिरकत नाही.

**नासै रोग हरै सब पीरा,**
**जपत निरंतर हनुमत बीरा ।।२५।।**

अर्थ– वीर हनुमान ! आपला निरंतर जप केल्याने सर्व रोग दूर होतात आणि सर्व पीडा नाहीश्या होतात.

**संकट तें हनुमान छुड़ावै,**
**मन क्रम बचन ध्यान जो लावै।।२६।।**

अर्थ – हे हनुमान ! विचार, कर्म आणि बोलण्यात ज्यांचं लक्ष आपल्यात असतं त्यांना आपण सर्व संकटांपासून मुक्त करतात.

**सब पर राम तपस्वी राजा,**
**तिनके काज सकल तुम साजा।।२७।।**

अर्थ – तपस्वी राजा श्री रामचंद्र सर्वश्रेष्ठ आहे त्यांच्या प्रत्येक कार्याला आपण सोपं केलं आहे.

**और मनोरथ जो कोइ लावै,**
**सोई अमित जीवन फल पावै।।२८।।**

अर्थ – ज्यांच्यावर आपली कृपा असते, त्यांच्या इच्छेला अशा प्रकारे फल प्राप्ती होते ज्यांची मर्यादा सांगता येऊ शकतं नाही.

**चारों जुग परताप तुम्हारा,**

**है परसिद्ध जगत उजियारा।।२९।।**

अर्थ – चारी युगांमध्ये सतयुग, त्रेता, द्वापर आणि कलियुगात आपलं यश पसरलेलं आहे, जगात आपली कीर्ती सर्वत्र प्रकाशमान आहे.

**साधु सन्त के तुम रखवारे,**

**असुर निकंदन राम दुलारे।।३०।।**

अर्थ – हे श्रीरामाचे लाडके! आपण सज्जनांची रक्षा करतात आणि दुष्टांचा विनाश.

**अष्ट सिद्धि नौ निधि के दाता,**

**अस बर दीन जानकी माता।।३१।।**

अर्थ – आपल्याला देवी जानकीकडून असे वरदान प्राप्त आहे, ज्याने आपण कोणालाही आठ सिद्धी आणि नऊ निधी देऊ शकतात.

**आठ सिद्धींची नावे :**

१) अणिमा– ज्यात साधक कोणालाही दिसत नाही आणि अवघड ते अवघड पदार्थांत प्रवेश करतो.
२) महिमा– ज्यात योगी स्वतःला खूप मोठं बनवतो.
३) गरिमा– ज्यात साधक स्वतः वजनदार बनवू शकतो.
४) लघिमा– ज्यात साधक हवं तितकं हलका होऊ शकतो.
५) प्राप्ती– ज्यात इच्छित पदार्थाची प्राप्ती होते.
६) प्राकाम्य– ज्याने इच्छेनुसार पृथ्वीत सामावू शकतात, आकाशात उडू शकतात.
७) ईशित्व– ज्याने सर्वांवर शासन करण्याचं सामर्थ्य प्राप्त होतं.
८) वशित्व– ज्यात दुसऱ्यांना वश करता येतं.

**राम रसायन तुम्हरे पासा,**

**सदा रहो रघुपति के दासा।।३२।।**

अर्थ – आपण निरंतर श्री रघुनाथाच्या शरणात राहतात, ज्यामुळे आपल्याकडे वृद्धापकाळ आणि असाध्य आजारापणाला नाश करण्यासाठी राम नाम औषधी आहे.

**तुम्हरे भजन राम को पावै,**

**जनम जनम के दुख बिसरावै।।३३।।**

अर्थ –आपलं भजन केल्याने श्री राम प्राप्त होतात आणि जन्म जन्मांतराचे दुःख दूर होतात.

**अन्त काल रघुबर पुर जाई,**

**जहां जन्म हरि भक्त कहाई।।३४।।**

अर्थ – आपल्या शरणात राहूनच अंतिम काळात श्री रघुनाथ धाम, अर्थात वैकुंठात जाता येऊ शकतं आणि जिथे जन्म मात्र हरि भक्तच्या रूपात मिळतो.

**और देवता चित न धरई,**

**हनुमत सेई सर्व सुख करई।।३५।।**

अर्थ – हे हनुमान ! आपली सेवा केल्याने सर्व प्रकाराचे सुख प्राप्त होतात, मग इतर देवतांची गरज भासत नाही.

**संकट कटै मिटै सब पीरा,**

**जो सुमिरै हनुमत बलबीरा।।३६।।**

अर्थ – हे वीर हनुमान ! आपलं स्मरण केल्याने सर्व संकट आणि वेदना नाहीश्या होतात.

**जय जय जय हनुमान गोसाईं,**

**कृपा करहु गुरु देव की नाईं।।३७।।**

अर्थ – हे स्वामी हनुमान ! आपली जय असो, जय असो, जय असो! आपली माझ्यावर कृपालु श्री गुरुसमान कृपा असावी.

**जो सत बार पाठ कर कोई,**

**छूटहि बंदि महा सुख होई।।३८।।**

अर्थ – शंभर वेळा हनुमान चालीसा पाठ केल्याने सर्व बंधनातून मुक्ती मिळेल आणि परमानंद मिळेल.

**जो यह पढ़ै हनुमान चालीसा,**

**होय सिद्धि साखी गौरीसा।।३९।।**

अर्थ – भगवान शंकर साक्षी आहे की याचे पाठ केल्याने सर्व मनोकामना पूर्ण होतील, निश्चित यश प्राप्ती होईल.

**तुलसीदास सदा हरि चेरा,**

**कीजै नाथ हृदय मंह डेरा।।४०।।**

अर्थ – हे नाथ हनुमान! तुलसीदास सदा श्रीरामाचे दास आहे. म्हणून आपण त्यांच्या हृदयात वास करा.

**पवन तनय संकट हरन, मंगल मूरति रूप।**

**राम लखन सीता सहित, हृदय बसहु सूरभूप।।**

अर्थ – हे संकट मोचन पवन कुमार! आपण आनंद मंगळ स्वरूप आहात। हे देवराज! आपण श्रीराम, सीता आणि लक्ष्मणासह माझ्या हृदयात राहावे हीच इच्छा.

**संकलन : श्रीपाद श्रीकांत रामदासी.**

◈ ◈ ◈


स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास जनसेवेच्या
'घरकुल' कर्जावर !
जनसेवा घरकुल कर्ज
रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)
* अटी लागू
आकर्षक व्याजदर
तत्पर सेवा
अल्प प्रोसेसिंग फी
रु. 2 कोटींपर्यंत कर्ज
संपर्क क्र. - 84 85 87 12 52
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
www.janasevabankpune.net

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त

Date of Publication : 26/03/2026 and
Date of Posting : 28/032/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे 'हिंदुबोध'.

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## ❋ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ❋

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

- रंगीत पूर्ण पान रु. १.५ लाख
- साधे पान रु. १ लाख
- साधे अर्धे पान रु. ५०,०००/-
- साधे १/४ पान रु. २५,०००/-
- साधे १/८ पान रु. १२,०००/-
- साधे १/१६ पान रु. ६,०००/-
- सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) रु. २,१००/-
- हिंदुबोध अंक मुल्य रु. २०/-
- वार्षिक वर्गणी रु. २००/-
- त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

## ❋ हिंदुबोधची वर्गणी ❋

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

हिंदुबोध

व्दारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१